ક્રમાંક:મઉમશબ/સંશોધન/2025/૨૪૦૭-૪૩
ગુજરાત માધ્યમિક અને
ઉચ્ચતર માધ્યમિક શિક્ષણ બોર્ડ,
સેક્ટર-10 બી, જૂના સચિવાલય પાસે,
ગાંધીનગર. તા.24/09/2025

પ્રતિ,
જિલ્લા શિક્ષણાધિકારીશ્રી, (તમામ)
ગુજરાત રાજ્ય.

વિષય:- ધોરણ-9 થી 12ના મરાઠી (પ્રથમ ભાષા) વિષયના પ્રશ્નપત્ર પરિરૂપ, નમૂનાના પ્રશ્નપત્રો, માસવાર આયોજન તેમજ શ્રીમદ્ ભગવદ્ ગીતાના મૂલ્યોના પ્રકરણ મોકલવા બાબત.

ઉપરોક્ત વિષય અન્વયે જણાવવાનું કે ગુજરાત રાજ્ય શાળા પાઠ્યપુસ્તક મંડળ દ્વારા ધોરણ-9 થી 12ના ગુજરાતી (પ્રથમ ભાષા), અંગ્રેજી (પ્રથમ ભાષા), હિન્દી (પ્રથમ ભાષા) તેમજ ઉર્દુ (પ્રથમ ભાષા)ના પાઠ્યપુસ્તકોમાં શ્રીમદ્ ભગવદ્ ગીતાના મુલ્યોને લગતા પ્રકરણોનો સમાવેશ કરવામાં આવેલ છે. જે અન્વયે ઉક્ત વિષયોના પ્રશ્નપત્ર પરિરૂપ, નમૂનાના પ્રશ્નપત્રો, માસવાર આયોજન તેમજ શ્રીમદ્ ભગવદ્ ગીતાના મૂલ્યોના પ્રકરણોની વિગતો અત્રેના તા.01/08/2025ના પત્રથી જાણ તથા અમલસારું મોકલવામાં આવેલ હતી.

ધોરણ-9 થી 12ના મરાઠી (પ્રથમ ભાષા)ના પાઠ્યપુસ્તકમાં ગુજરાત રાજ્ય શાળા પાઠ્યપુસ્તક મંડળ દ્વારા શ્રીમદ્ ભગવદ્ ગીતાના મૂલ્યોના પ્રકરણોનો સમાવેશ કરવામાં આવેલ છે. જે અન્વયે ધોરણ-9 થી 12ના મરાઠી (પ્રથમ ભાષા)ના પ્રશ્નપત્ર પરિરૂપ, નમૂનાના પ્રશ્નપત્રો તેમજ માસવાર આયોજન તજજ્ઞશ્રીઓ દ્વારા તૈયાર કરવામાં આવેલ છે. ઉક્ત પ્રશ્નપત્ર પરિરૂપ, નમૂનાના પ્રશ્નપત્રો, માસવાર આયોજન તેમજ શ્રીમદ્ ભગવદ્ ગીતાના મૂલ્યોના પ્રકરણ આ સાથે મોકલવામાં આવે છે. જે આપના તાબાની તમામ મરાઠી માધ્યમની માધ્યમિક અને ઉચ્ચતર માધ્યમિક શાળાઓને જાણ તથા અમલ સારૂં મોકલી આપશો.

સંયુક્ત નિયામક
ગુજરાત માધ્યમિક અને
ઉચ્ચતર માધ્યમિક શિક્ષણ બોર્ડ,
ગાંધીનગર

બિડાણ- ઉપર મુજબ.

<u>નકલ સવિનય રવાના :-</u>

૧) માન. અધ્યક્ષશ્રી, ગુ.મા.અને ઉ.મા.શિક્ષણ બોર્ડ, ગાંધીનગર.
૨) નાયબ અધ્યક્ષશ્રી, ગુ.મા.અને ઉ.મા.શિક્ષણ બોર્ડ, ગાંધીનગર.

<u>નકલ રવાના :-</u>

- નાયબ નિયામકશ્રી, પરીક્ષા (સા.પ્ર., વિ.પ્ર., એસ.એસ.સી.) જાણ તથા જરૂરી કાર્યવાહી સારૂં.

# 1 पथ-प्रदर्शिनी गीता

अक्षरा, जर्नादन, गार्गी आणि माधव सुट्टीच्या दिवशी बागेत खेळायला गेले होते तिथे हिवाळ्याच्या सकाळच्या कोवळ्या उन्हाचा आस्वाद घेण्यासाठी सर्व आबाल वृद्ध आले होते. अगळे आपापल्या आवडीच्या कामात गुंतले होते. आजोबा एका कोपऱ्याच्या बाकावर अतिशय लक्षपूर्वक वाचत होते.

अक्षराची नजर आजोबांच्या पुस्तकावर पडली. आजोबांची वाचनाची एकाग्रता आणि चेहऱ्यावरचे प्रसन्न भाव पाहून तिने इतर मित्रांना आजोबांकडे इशारा करून म्हटले, हे बघा आजोबांच्या हातातील पुस्तकावरील चित्र ! सर्व मित्रांचे लक्ष पुस्तकाच्या मुखपृष्ठावर खिळले होते. लगेच ज़नार्दन म्हणाला, एखाद्या जिज्ञासू व्यक्तिला एक महापुरुष मार्गदर्शन देत आहेत असे वाटते. मुलांच्या मनात आणखी कुतूहल निर्माण झाले. म्हणून ते आजोबांच्या जवळ जाऊन खाली बसले व पुस्तकाच्या मुखपृष्ठाकडे टक लाऊन पाहू लागले. आजोबांची नजर त्या मुलांवर पडली. त्यांनी पुस्तक बाजूला करून स्मित केले मुलेही हसली अक्षराने पुढाकार घेऊन आजोबांना विचारले.

**अक्षरा** : आजोबा, तुम्ही हे कोणते पुस्तक वाचत आहेत ?

**आजोबा** : बाळा – ही श्रीमद् भगवद्‌गीता आहे.

**माधव** : या पुस्तकाबद्दल आम्हाला सांगाल ?

**आजोबा** : आवश्य, या पुस्तका विषयी. लक्ष देऊन ऐका हे पुस्तक महर्षी वेद व्यास यांनी लिहिलेल्या महाभारताचा, एक प्रसंग आहे. हे महाभारत अठरा अध्यायांमध्ये विभागलेले आहे. ज्याच्या भीष्मपर्वाचा हा प्रसंग आहे.

श्रीकृष्णाने अर्जुनाला 700 (सातशे) श्लोकांमध्ये दिलेल्या जीवनदर्शनाचे यात पाथेय आहे.

**जनार्दन** : हा प्रसंग किती जूना आहे आजोबा ?

**आजोबा** : साधारण पाच हजार वर्षांपूर्वीचा.

**गार्गी** : एवढा जुना प्रसंग ?! तो पण कोणी एका व्यक्तिला दिलेला बोध जो तुम्ही आज वाचत आहात ?

**आजोबा** : हो बाळा, कारण की श्रीकृष्ण आणि अर्जून यांच्यामधील हा संवाद मानवी जीवनासाठी तिन्ही कालखंडात (भूतकाळ, भविष्य आणि वर्तमान) मांडला आहे.

**अक्षरा** : आजोबा, गीताजी आपल्या जीवनातील सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन करतात ना !

**आजोबा** : हो, हा श्रेष्ठ ग्रंथ मानवी जीवनासाठी मार्गदर्शकाचे काम करतो. आणि हो, ते मानवजातीच्या हितासाठी तितकेच लागू पडते. मानवी जीवनासाठी हे एक महान तत्वज्ञान आहे. श्रीकृष्ण गीतेच्या सातव्या अध्यायातील दुसऱ्या श्लोकात म्हणतात.....

**ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।**

**यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ (गीता 7.2 )**

(अर्थात, मी तुला विज्ञानासहित या तत्वज्ञानाला संपूर्णपणे सांगेन, जे जाणून संसारमध्ये पुन्हा आणखी काहीही जाणण्यायोग्य शिल्लक राहत नाही.)

**माधव** : आजोबा मानवाच्या सर्वांगीण विकासाची रहस्ये आणि आजच्या वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय आणि जागतिक समस्यावर उपाय गीताजी मध्ये दिलेले आहेत वाटतं !

**आजोबा** : होय, तुम्ही सर्व बरोबर समजत आहात. म्हणूनच महात्मा गांधीनी म्हटले आहे की, "माझ्यावर कोणतेही धार्मिक संकट आले तर मी माता गीतेचा आश्रय घेतो."

**जनार्दन** : अरे वा ! आजोबा गीता महापुरूषांसाठी पण प्रेरणादायी ठरत आहे.

**गार्गी** : ही तर लहान मोठे सर्वांना मार्गदर्शक आहे, खरे आहे ना आजोबा ?

**आजोबा** : ही, अमेरिकेचे महान तत्वज्ञ हेनरी डेविड थोरो यांनी लिहिले आहे की ''मी रोज सकाळी माझे हृदय आणि बुद्धिला गीतारूपी पवित्र पाण्याने स्नान करतो.''

**अक्षरा** : गीताजीचे सिद्धांत आणि मूल्यांना अनुसरुनच या यशस्वी महापुरूषां एवढे मोठे काम करू शकले. हे मला आता माहीत झाले.

**माधव** : अशा श्रेष्ठ व्यक्ति तर कित्येक असतील ज्यांना गीताजी ने मार्ग दाखाविला असेल.

**जनार्दन** : आजोबा, गीताजींची महानता आज मला समजली. आता तर आम्हाला गीता ज्ञान विषयी अधिक जाणून घेण्याची इच्छा झाली आहे.

**गार्गी** : आजोबा, मानवा-मानवा मध्ये लहान मोठ्यांमध्ये भेदभाव ही एक मोठी समस्या आहे. यावर गीतेत काय उपाय आहे ?

**आजोबा** : तुझा प्रश्न योग्य आहे गार्गी. खूप लोक मी मोठा, तू लहान असा भेदभाव करतात. या समस्येचा उपाय गीताजी देते. ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन: ॥ (गीता 15.7) (अर्थात, या शरीरात असलेला सनातन जीवात्मा माझाच अंश आहे.)

**अक्षरा** : तर मग आपण सगळे एकसमान झालो की नाही ?

**आजोबा** : गीताजी पण म्हणते. समोऽहंसर्वभूतेषु । (गीता 9.29) (अर्थात, मी सर्व जीवांबद्दल समभावयुक्त राहतो.)

**माधव** : आजोबा तुमचे म्हणणे बरोबर आहे. कोणी उच्च किंवा कोणी निम्न नसते.

**जनार्दन** : व्यक्तिची जात, कुळ, वय, भाषा, प्रदेश, रंग यापैकी सर्व मानव समान आहेत.

**आजोबा** : माणूस कर्मानेच लहान किंवा मोठा होतो. असे अनेक दृष्टांत आहेत की गरीब कुटुंबात जन्म झाला असला तरी पण कर्मामूळे त्या व्यक्तिला मोठेपण प्राप्त होते. म्हणून गीताजी म्हणते नियतं कुरु कर्म । (गीता 03.8) (अर्थात तू तुझे नियत कर्म कर.)

**गार्गी** : आजोब, अशा एखाद्या व्यक्तिचा जीवन परिचय सांगा, की च्यांचा जन्म गरीब कुटुंबात झाला असेल पण त्यांनी नियत कर्म करून महानता मिळविली असेल.

**आजोब** : मी तुम्हाला सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनातीत एक अनोखी गोष्ट सांगतो.

सिन्धुताईंचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या अत्यंत गरीब असल्याने त्यांना फक्त चौथीपर्यंतचे शिक्षण घेता आले. त्या लहाणपणी गाई-म्हशीं चरवता चरवता शिकायच्या. खराब आर्थिक स्थितिचा पण त्यांनी स्वत: अनुभव केला त्यांनी गरिबांच्या विकासासाठी काम करण्याचा दृढ निश्चय केला. तेथील समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. असहाय्य मुलांसाठी त्यांनी अनेक आश्रमही स्थापन केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' देऊन सन्मानित केले आहे.

समजले ना मुलांनो ! अशाप्रकारे गीताजी आपल्या सर्वांना सागतात की या सृष्टित कोणीही लहान किंवा मोठा नाही. ते फक्त मानवनिर्मित कुंपन आहे. हे कुंपन काढून टाकून सर्वांना समान वागणूक दिली पाहिजे.

अक्षरा : आजोबा तुम्ही समानतेविषयी खूपच महत्त्वपूर्ण गोष्ट केली, मला अभ्यासक्राविषयी एक कुतूहल आहे तर विचारू का ?

आजोबा : आवश्य विचार, जे काही कुतूहल असेल ते.....

अक्षरा : आपण ज्या विषयांचा अभ्यास करतो त्यात कोणते विषय महत्त्वाचे असतात ?

आजोबा : शाळेत शिकवले जाणारे सर्व विषय सारखेच महत्त्वाचे. असतात. पण तुम्ही ज्या विषयांचा अभ्यास करतात त्यात कुशलता असणे अनिवार्य आहे. गीताजी म्हणतात की - योग: कर्मसु कौशलम् । (गीता 2.50) (कर्म कुशलतेपूर्वक करणे तो योग आहे.)

जनार्दन : म्हणजे ज्यांच्या जवळ कामाची कुशलता आहे तेच कामाला लायक समजले जातील असे ना ?

आजोबा : तू बरोबर सांगितले म्हणूनच तर भारत सरकार 'प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना' चालवते. ज्यांच्याकडे कौशल्य आहे त्यांना नेहमी श्रेष्ठ काम मिळतेच.

गार्गी : पद्मविभूषण विश्वनाथ आनंद केवळ आपल्या कौशल्यामुळेच बुद्धिबळाच्या खेलात जगज्जेते ठरले.

आजोबा : गार्गी तू योग्य उदाहरण दिले. आपण सर्व विद्यार्थ्यांनी आपल्याला आवडणारा विषय निवडावा आणि त्याला चिकटून रहावे. गीताजीचा उपदेश पण तेच सांगते.

**व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन ।**

**बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ (गीता 2.41)**

(अर्थात या कर्मयोगात निश्चयात्मिका बुद्धी एकच असते परंतु अस्थिर विचार असणाऱ्या, विवेकहीन व सकामी लोकांची बुद्धी निश्चितच अनेक भेद मानणारी आणि अनंत असते.)

माधव : हो आजोबा, एकदा आपण एखाद्या विषयावर निर्णय घेतला की आपण त्यापासून दूर जाऊ नये.

जनार्दन : आजोबा, कल्पना चावला यांचाही लहानपणापासूनच ॲरोनॉटिकल इंजिनीअर व्हायचा निश्चय होता. तिने लहानपणापासूनच अंतराळात प्रवास करण्याचे स्वप्न पाहिले होते. त्यांच्या स्थिर निश्चयामुळेच त्यांनी अंतराळ क्षेत्रात विविध यश संपादन केले.

गार्गी : आजोबा, तुम्ही म्हटल्याप्रमाणे. जर आपण मन स्थिर केले आणि कोणत्याही एका विषयात खोलवर अभ्यास केला तर आपण कोणत्याही मोठ्या समस्येवर मात करू शकतो. असे ना ?

आजोबा : हो, असेच पण त्यात दृढ निश्चय असणे जरूरी आहे गीताजी सांगतात. यतात्मा दृढनिश्चय: ॥ (गीता 12.14) (अर्थात संयमित आणि दृढनिश्चययुक्त)

गार्गी : एखाद्या लहान मुलाने दृढ निश्चय केला असेल आणि देशातील सर्वात मोठी समस्या सुटली असे कधी झाले आहे का ?

आजोबा : हो, राजा राममोहनरॉय यांनी लहानपणी केलेल्या 'दृढ निश्चयामुळेच' त्यांनी 'सतीप्रथा' सारख्या वाईट प्रथांना बंद केले.

माधव : आजोबा, राजा राममोहनरॉय यांच्या महान कार्याची ओळख करून द्या ना ?

आजोबा : राजा राममोहनरॉय यांचे आई-वडील लहान असतानाच वारले. राजा राममोहनरॉय त्यांच्या भाऊ वहिनीसोबत राहत होते. भावाचाही काही असाध्य आजाराने मृत्यू झाला. त्यांच्या वहिनीला सती जावे लागले. राजा राममोहनरॉय यांचे

या असह्य वेदनांमुळे हृदय द्रवले होते. यामुळे बालवयातच राजा राममोहनरॉय यांनी ''सतीप्रथा'' बंद करण्याचा 'संकल्प' घेतला त्यामुळेच ते महान कार्य पूर्ण करू शकले.

**अक्षरा** : मित्रांनो ! आपण पण एखाद्या समस्येवर मात करण्याचा निर्धार केला पाहिजे.

**आजोबा** : हो पण हे लक्षात ठेवले पाहिजे की एखाद्या समस्येवर मात करण्यासाठी मन स्थिर करावे लागते. प्रलोभनामुळे उद्दिष्टे वारंवार बदलली, तर अपेक्षित परिणाम साध्य होणार नाहीत.

**माधव** : खरे आहे – आजोबा, आपण अनेकवेळा वेगवेगळ्या गोष्टी ऐकून आपले मन बदलतो.

**आजोबा** : म्हणूनच गीताजी म्हणतात की आपले मन स्थिर असणे जरूरी आहे.

**श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।**

**समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥ ( गीता 2.53 )**

( अर्थात जेव्हा अनेक प्रकारच्या सिद्धांतांच्या श्रवणाने विचलित झालेली तुझी बुद्धी परमात्म्यामध्ये अचल आणि स्थिर राहील, तेव्हा तुला समत्वरूप योग प्राप्त होईल. अर्थात तुझा परमात्म्याशी नित्य संयोग होईल. )

**गार्गी** : आजोबा, मला तर दोन्ही गोष्टी चांगल्या समजल्या आहेत. कोणतेही निश्चित केलेले कार्य पूर्ण करण्याचा निर्धार आणि ते कार्य पूर्ण होईपर्यंत मनाची खंबिरता आवश्यक आहे.

**अक्षरा** : आजोबा, गीताजीच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही आम्हाला 'दृढता' आणि 'स्थिरता' विषयी उपयुक्त मार्गदर्शन केले.

**आजोबा** : मुलांनो, हे गुण विकसित करण्यासाठी तुम्ही सर्वांनी सतत प्रयत्न केले पाहिजे.

**गार्गी** : तर आपल्याला स्वत:वर काम करावे लागेल.

**आजोबा** : गार्गी बरोबर आहे. मुलांनो आपणच आपले खरे मित्र आणि शत्रू आहोत.

**जनार्दन** : म्हणजे व्यक्ति स्वत:च स्वत:चा मित्र आणि स्वत:च स्वत:चा शत्रू असे होय ना ?

**अक्षरा** : भगवान बुद्धांनीही हेच सांगितले आहे. की, 'आत्मदीपो भव' स्वत:चा दिवा स्वत:च बन.

**आजोबा** : हो अगदी बरोबर आहे. भगवान बुद्धांनीही हेच सांगितले आहे. हे तत्त्व श्रीमद् भगवद्गीतेतही सांगितले आहे.

**बुन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।**

**अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ( गीता 6.6 )**

( अर्थात ज्या जीवात्म्याने मन आणि इंद्रियांसह शरीर जिंकलेले आहे त्या जीवात्म्याचा तर तो स्वत:च स्वत:चा मित्र आहे व ज्यानें मन–इंद्रियांसह शरीर जिंकले नाही तो स्वत:शीच शत्रूसारखे शत्रुत्व करतो. )

**गार्गी** : आजोबा, असे कोणी महापुरूष झाले आहे का, ज्याने स्वत:च्या आत्मबळाने खूप मोठी क्रांती केली असेल ?

**आजोबा** : हो, आदि शंकराचार्य, जे भारताचे महान तत्त्वज्ञ होते.

**जनार्दन** : आजोबा आम्हाला आदि शंकराचार्यां बद्दल आधिक माहिती सांगाल का ?

**आजोबा** : आदि शंकराचार्यांचा जन्म केरळ मधील कलाडी गावात झाला होता. शंकराचार्यांनी आपल्या 32 वर्षांच्या छोट्या आयुष्यात खूप काम केले. त्यांनी उपनिषदे, श्रीमद् भगवद्गीता आणि ब्रह्मसूत्रावर भाष्ये लिहिली. या शिवाय त्यांनी अनेक ग्रंथ आणि स्तोत्रांची रचना केली. त्यांनी चार मठांची स्थापना केली, ज्यात दक्षिणेमध्ये शृंगेरी मठ पश्चिमेस द्वारका मठ, उत्तरेमध्ये बदरीनाथ मठ आणि पूर्वमध्ये जगन्नाथपुरीमध्ये गोवर्धन मठाचा समावेश होतो.

**अक्षरा** : आजोबा, तुम्ही खरे सांगितले, खरच व्यक्ति स्वतःच स्वतःचा 'उद्धारक' असतो.

**गार्गी** : गुजरातला अभिमानास्पद बनवणाऱ्या सरिता गायकवाडचे कर्तृत्वही अशीच एक घटना आहे. गुजरातच्या टोकावरील डांग जिल्ह्यातील 'कराडीआंबा' नावाच्या गावातील असूनही त्या महान भारतीय धावपटू बनल्या. त्या गुजरात सरकारच्या 'बेटी बचावो' मोहिमेच्या ब्रॅंड ॲम्बेसेडर देखील आहे.

**माधव** : "आजोबा, आम्हाला उत्तम गुणांचा विकास का केला पाहिजे त्याचे आम्हाला उपयोगी पथ-प्रदर्शन करीत आहेत."

**जनार्दन** : "माधव तू तरोबर आहे, आजोबा, माणसामध्ये कोणते श्रेष्ठ गुण असले पाहिजे. ज्यामुळे तो आदर्श होईल ? ते सांगा ना..."

**आजोबा** : "जीवन आदर्श बनविण्यासाठी गीताजी मध्ये काय सांगितले आहे ते मी तुम्हाला सांगतो....."

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।**

**निर्ममो निरहहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ ( गीता 12.13 )**

(अर्थात् जो पुरूष सर्व प्राणिमात्रांमध्ये द्वेषभावरहीत स्वार्थरहित सर्वांचा प्रेमी आणि कारणरहित दयाळू आहे तसेच ममतारहित, अहंकाररहित, सुख-दुःखाच्या प्राप्तीत सम आणि क्षमाशील आहे.)

**अक्षर** : आजोबा, गीताजींच्या या मार्गावर चालून एखाद्या महापुरूषाने एक आदर्श जीवन जगून दाखविले असेल तसे उदाहरण सांगा ना.

**आजोबा** : श्री सत् देविदास. जे सौराष्ट्र पंथातील जुनागढ जिल्ह्यात भेंसाण तालुक्यातील परब-वावडी गावात अंदाजे 350 वर्षापूर्वी होऊन गेले. सौराष्ट्र पंथाचे ते महान संत होते. त्यांच्या काळात लोक कुष्ठरोग, क्षय यासारख्या असाध्य रोगांनी ग्रस्त होते. त्यांनी त्यांची सेवा केली. त्यांचा आश्रम आज परबधाम नावाने तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे.

**अक्षरा** : खरच आजोबा, सत्कर्म करणाऱ्या लोकनायकांची आठवण सगळ्यांनाच असते अशी सद्गुणी माणसे आपल्याला जीवन कसे जगावे ते शिकवितात.

**जनार्दन** : आजोबा आम्ही तुम्हाला वचन देतो की सत्कर्म करून आम्हीही श्रेष्ठ बनू.

**आजोबा** : तुम्ही सर्व श्रेष्ठत्व मिळवा. मी तुम्हाला शुभेच्छा देतो. समाजातील सर्व श्रेष्ठ व्यक्तिंनी एकत्र येऊन सामाजिक कार्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. कारण इतर लोक त्याचे अनुकरण करतात. गीताजी सांगतात.....

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।**

**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ ( गीता 3.21 )**

(अर्थात् सर्वोत्तम माणूस जे आचरण करतो, इतर लोकही तेच आचरणात आणतात, तो जे काही प्रमाणित करतो, संपूर्ण मानव-समूह त्यानुसार वागू लागतो.)

**अक्षरा** : "आजोबा आपणही अनेक महापुरूषांच्या कृतीतून प्रेरणा घेतो."

**आजोबा** : बाळा, ते खरे आहे. या संदर्भात एक गोष्ट माझ्या ध्यानात आहे.

एके दिवशी स्वामी विवेकानंद त्यांचे गुरू रामकृष्ण परमहंस यांच्या जवळून ज्ञानाच्या गोष्टी ऐकत होते. त्यावेळी विवेकानंद म्हणाले, ''गुरूजी, माझ्या मनात तपश्चर्या करण्याची इच्छा निर्माण झाली आहे. त्यासाठी हिमालयातील शांत गुफा अधिक योग्य आहेत. कारण की मला तेथे कोणत्याही प्रकारचे ध्यानभंग केल्या शिवाय तपस्या करता येईल. याबद्दल आपण मला सांगा.''

विवेकानंदांचे म्हणणे ऐकून रामकृष्ण परमहंस हसता हसता म्हणाले, ''वत्स, जेव्हा तू निर्णयच केला आहे तर मग माझे मन का विचारत आहेस ?''

हे ऐकून विवेकानंद म्हणाले, ''गुरूजी, अजून तर माझ्या जीवनाची सुरूवात आहे. मी माझे अनेक निर्णय घाईतही घेऊ शकतो. म्हणूनच तुमच्याजवळून मार्गदर्शन हवे आहे. या विषयी कृपया दिशानिर्देशन करा.''

तेव्हा रामकृष्ण परमहंस म्हणाले, 'वत्स, जर तुला माझे मार्गदर्शन हवे असेल तर मी म्हणेन की आपल्या येथे लोक उपासमारीने आणि रोगाने मरत आहेत. निराधार लोकांभोवती अज्ञान व्यापले आहे. एका बाजूला लोक रडत आहेत. दु:खी अहेत. आणि तुम्ही हिमालयाच्या कुशीत. तपश्चर्या-समाधीचा आनंद घेऊ शकाल. तुमचा आत्मा ते स्वीकारेल का ?

गुरुजीच्या या शब्दांनी विवेकानंदजींना विचार करायला लावले. आता त्यांना स्पष्टपणे समजले की गुरुंना काय हवे आहे ? क्षणाचाही विलंब न लावता स्वामी विवेकानंदांनी मनाशी निश्चय केला की, ''यानंतर माझे संपूर्ण जीवन दीन-दुबळ्यांच्या सेवेसाठी समर्पित आहे.''

श्रीमद् भगवद्गीता जी आपल्याला सुचविते की आज देशात अनेक समस्या आहेत. त्यासाठी आपण सज्जनांनी प्रयत्न केले पाहिजेत. कारण आपण जे करतो त्याचे इतरही पालन करतील.

गीताजींचे तत्व आणि मूल्ये आपल्या जीवनात पावलो पावली मार्गदर्शन करण्यास सक्षम आहेत. आपण सर्वांनी श्रीमद् भगवद्गीतेचे पठन, मनन आणि चिंतन करू या आणि तिचा आपल्या जीवनात उपयोग करू या. जीवन यशस्वी करायचे असेल तर या ज्ञानसागराचे अमृत आपल्या दैनंदिन जीवनात उतरवून व एक सार्थक जीवन जगण्याचा प्रयत्न करू या.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) महाभारतात किती पर्व आहेत ?

(2) धर्मसंकटाच्या वेळी गीतामातेचा आश्रय कोण घेतो ?

(3) भारत सरकारकडून सिन्धुताई सपकाळ यांना कोणता पुरस्कार देण्यात आला आहे ?

(4) सतीप्रथा कोणी बंद केली होती ?

(5) आदि शंकराचार्य यांचे गुजरातमधील असलेल्या मठाचे नाव सांगा ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) अध्याय 2 च्या 41 व्या श्लोकातून तुम्हाला कारकिर्दी घडविण्यासाठी कोणते मार्गदर्शन मिळते ?

(2) माणसा-माणसातील भेदभाव मिटवण्यासाठी गीतेतील कोणता श्लोक आपल्याला मार्गदर्शन करतो ?

(3) तुम्हाला असे वाटते का तुमचा मित्र टी.व्ही किंवा इतर माध्यमांमुळे निर्णय घेण्यास विचलित होत आहे. गीतेच्या अध्याय 2 चा 53 व्या श्लोकचा अभ्यास केल्या नंतर तुम्ही त्याला कसे मार्गदर्शन द्याल ?

(4) "मीच माझ्या जीवनाचा शिल्पकार" ही गोष्ट गीतेच्या कोणत्या श्लोकात सांगितली आहे ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(3) गीतेच्या अध्याय 12 च्या 13 व्या श्लोकात सांगितलेल्या गुणांसाठी स्वत:चे मूल्यांकन करा:

(प्रत्येक गुणासाठी तुम्ही किती स्टार द्याल ? ते स्टार गडद करा.)

| | |
|---|---|
| कोणचाही द्वेष करीत नाही. | ✡ ✡ ✡ ✡ ✡ |
| मित्रभाव | ✡ ✡ ✡ ✡ ✡ |
| करूणा | ✡ ✡ ✡ ✡ ✡ |
| वस्तूंसाठी फार मोह नाही. | ✡ ✡ ✡ ✡ ✡ |
| अहंकाररहित. | ✡ ✡ ✡ ✡ ✡ |
| सुख-दुःखात फार विचलित होत नाही. | ✡ ✡ ✡ ✡ ✡ |

## विद्यार्थी-प्रवृत्ती

- मितत्रांसोबत 'मी सिंधुताई सपकाळ' चित्रपट पहा आणि तुम्ही काय शिकला ते नोंदवा.
- तुम्ही ठरवलेला संकल्प पूर्ण करण्यासाठी तुम्ही गीताजींचे कोणते तत्व पाळाल त्याची वडीलधाऱ्यांशी चर्चा करा.

## शिक्षकाची भूमिका

- शाळेतील गीता आणि जागतिक समस्यांवर वक्त्याचे व्याख्यान आयोजित करा.
- श्लोक, गायन, निबंध किवा वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करा.
- विनोबा भावे यांचे "गीता प्रवचने" पुस्तकाची विद्यार्थ्यांसोबत समीक्षा करा.
- गीताजीमध्ये वर्णन केलेले चांगले सुविचार नोटीस बोर्डवर लिहा.
- सध्याच्या अध्यायातील संवाद प्रार्थना सभेत सादर करा.

# 2 भगवद्गीता आणि मी

शाळेत गीता जयंती साजरी होत आहे. याबाबत शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. शाळेची विविध प्रकारे सजावट करण्यात आली आहे. वक्तृत्व स्पर्धा, भीम, शकुंतला इत्यादि महाभारतातील पात्रांची वेशभूषा आणि एकपात्री अभिनय स्पर्धा संपन्न झाली. आता प्रमुख पाहुण्यांचे भाषण सुरू होईल.

विद्यार्थी मित्रांनो,

आज मार्गशिर्ष शुक्ल एकादशी. श्रीमद् भावगद्गीतेचा जन्मदिवस. हा एक असा ग्रंथ आहे. ज्याचा जन्मदिवस साजरा केला जातो. तुम्हा सर्वांना गीता जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा.

भगवद्गीतेने भारतातील ऋषीमुनींना आणि क्रांतिकारकांना दिशा दिली आहे. त्याचबरोबर गीतेचा परिणाम आधुनिक आणि पाश्चात्य विचारवंतांवरही झाला आहे. गीता हा एक असा ग्रंथ आहे ज्याला कोणत्याही सीमा नाही. तुम्हाला आवडतील अशा काही गोष्टी सांगतो.

आपण जे रॉबर्ट ओपनहेईमर यांना 'ॲटमबॉम्बचे जनक' म्हणून ओळखतो. त्यांनी स्वत: सांगितले आहे की, ॲटमबॉम्बच्या पहिल्या विस्फोटाच्या वेळी गीतेच्या अकराव्या अध्यायातील एक श्लोक त्यांच्या तोंडून बाहेर पडला होता. तर त्यांनी गीतेचा किती अभ्यास केला असेल ! विशेष म्हणजे त्यांनी भगवद्गीतेचा अभ्यास मूळ संस्कृतमध्येच केला होता. गीतेने त्यांच्या जीवनाच्या तत्त्वज्ञानाला सर्वाधिक घडविले आहे. असे त्यांनी म्हटले आहे. तर एक भारतीय भौतिकशास्त्रज्ञ डॉ. बी.एम. गुप्ता आधुनिक संशोधनाला पुढे नेण्यासाठी 1948-49 मध्ये अमेरिकेला गेले होते. तेव्हा ते प्रिन्स्टन युनिवर्सिटी मध्ये आल्बर्ट आइन्स्टाईनला भेटले. आइन्स्टाईन यांना कळाले की डॉ. बी.एम. गुप्ता भारताचे आहेत. तर त्यांनी भगवद्गीता आणि भारताच्या आध्यामिक आणि तात्त्विक परंपरेबद्दल उत्कटतेने चर्चा केली. त्यांनी श्री गुप्ता यांना त्यांचा गीता आणि इतर संस्कृत ग्रंथाचा वैयाक्तिक संग्रहही दाखवला.

एक दुसरी गोष्ट सांगतो, एकदा रवीन्द्रनाथ टागोर अमेरिकेतील एका मोठ्या पुस्तकाच्या दुकानाला भेट देण्यासाठी गेले असता त्यांना तेथे ठेवलेली सर्वात लोकप्रिय किमती पुस्तके पाहण्याचा योग आला तेथील अधिकाऱ्याने त्यांच्या समोर कापडात गुंडाळून काळजीपूर्वक जपून ठेवलेली अनेक पुस्तके आणली त्यापैकी रवीन्द्रनाथ टागोरांचे लक्ष श्रीमद् भगवद्गीताकडे दर्शविण्यात आले होते. राल्फ वाल्डो एमर्सन हा एक अमेरिकन तत्त्वज्ञ व क्रांतिकारक पण होता. थॉमस कार्लाईल स्कॉटलॅन्डचा महान इतिहासकार आणि तत्त्वचिंतक होता. एकदा अेमर्सन कार्लाईलला भेटायला गेले. कार्लाईलने अेमर्सनला चार्ल्स विल्किन्स द्वारे केलेल्या भगवद्गीतेचा अनुवाद दाखविला. तेव्हा त्यांनी अेमर्सनला सांगितले, 'हे सर्वात प्रेरणादायी पुस्तक आहे; त्याने माझ्या जीवनात आराम आणि आश्वासन दिले आहे. मला आशा आहे की तुम्हाला पण त्याचा हाच फायदा होईल.' कार्लाईलने त्यांना गीता भेट दिली. तुम्हाला समजले असेलच की गीता सर्वांना आपलीशी का वाटते !

मला कधी कधी वाटते की अर्जुनमध्ये असे कोणते गुण असतील की एवढा महान ग्रंथ गीता सांगण्यासाठी भगवतांनी अर्जुनाची निवड केली ? तुम्हाला माहिती आहे की विद्यार्थीदशेपासूनच अर्जुन थोडा वेगळा आहे. गुरूकुलमध्ये रात्री जेवतांना एकदा दिवा विझला. तरीपण सर्वजन शांततेने जेवले. आणि अर्जुनच्या डोक्यात ही गोष्ट पक्की झाली की सतत सरावामुळे अंधारात सुद्धा योग्य ठिकाणीच घास जातो तर सतत सरावामुळे अंधारात लक्षवेध पण करता येईल. त्यादिवसा पासून काम सुरू. रात्री अंधारातही अर्जुनाच्या धनुष्याचा आवाज सर्वांना ऐकू येऊ लागला.

आता करू या अर्जुनच्या एकाग्रतेची गोष्ट. सगळ्यांना पक्षी दिसला आणि अर्जुनला मात्र पक्ष्याचा डोळाच दिसला. ही गोष्ट तर तुम्हा सगळ्यांना माहीतच असेल.

अर्जुनमध्ये असलेल्या गुणांच्या वाढीसाठी श्रीमद् भगवद्गीतेमध्ये मार्गदर्शन आहे. गीतेमध्ये. विद्यार्थ्यांसाठी वेगळा अध्याय नाही. परंतु आदर्श विद्यार्थ्यांच्या लक्षणांनी गीता भरपूर आहे.

विद्यार्थ्यांचे एक मोठे लक्षण आहे जिज्ञासा. जगात पण आता Inquiry Based Learning (प्रश्न आधारित अध्ययन) वर भर दिला जात आहे. संपूर्ण गीता Inquiry Based Learning चे श्रेष्ठ उदाहरण आहे. अर्जुनला अनेक प्रश्न आहेत, त्याचे भगवंतानी जे उत्तर दिले आहे, त्याचेच नाव 'गीता'. गीतेत म्हटले आहे. की :

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**

**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ( गीता 4.34 )**

( अर्थात् ते ज्ञान तू तत्त्वदर्शी ज्ञानीयांच्या जवळ जाऊन समजून घे, त्यांना विधीवत प्रणिपात केल्याने, त्यांची सेवा केल्याने आणि कपट सोडून नम्रपणे प्रश्न विचारल्याने ते परमात्मतत्त्वाला चांगल्या प्रकारे जाणणारे ज्ञानी महात्मे तुला त्या तत्वज्ञानाचा उपदेश करतील. )

योग्य व्यक्तिकडे जाऊन नम्रपणे प्रश्न विचारले पाहिजेत. हा ज्ञानप्राप्तीचा रस्ता आहे. आपण जे काही शिकतो - तो अभ्यासक्रमाचा एकक असो किंवा सह अभ्यासक्रम प्रवृत्ती असो. प्रश्न विचारले पाहिजे आणि प्रश्न विचारण्यासाठी गीतेची अट आहे. : प्रणिपातेन – साष्टांग दंडवत करून.

नम्रता आणि सेवा या सद्गुणांच्या व्यतिरिक्त गीतेने इतर गुण सांगितले आहेत. जे आपल्याकडे असले पाहिजेत.

**अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।**

**दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥ ( गीता 16.1 )**

( अर्थात् निर्भयता, अंत:करणाची पूर्ण शुद्धी, तत्त्वज्ञानासाठी ध्यानयोगात निरंतर दृढ स्थिती. आणि दान, इंद्रिय संयम, यज्ञ, वेद शास्त्राचे पठण-पाठण. आणि भगवंताच्या नामाचे व गुणांचे कीर्तन, स्वधर्म पालनासाठी कष्ट सहन करणे. तसेच शरीर व इंद्रियांसह अंत:करणाची सरळता असणे. )

दुसरी एक गोष्ट गीतेत खूप छान आहे. जी तुम्हाला आवडेल. कदाचित तुमच्यापैकी अनेक मित्रांना असा अनुभव पण असेल.

**ध्यायती विषयान् पुंसः सङ्गस्तेपूषजायते ।**

**सङ्गात्सञ्जायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ( गीता 2.62 )**

( अर्थात् विषयांचे चिंतन करणाऱ्या पुरूषाची त्या विषयांमध्ये आसक्ती होत जाते. आसक्तीमुळे त्या विषयांची इच्छा उत्पन्न होते आणि इच्छापूर्तीत विघ्न आल्याने क्रोध उत्पन्न होतो. )

आवडणाऱ्या गोष्टीचे चिंतन केल्याने ईच्छा तीव्र होते. आता सर्व ईच्छा थोडीच पूर्ण होतात ? तर मग येतो क्रोध.

**म्मोहः सम्मोहात्स्मुतिविभ्रमः ।**

**स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यचि ॥ ( गीता 2.63 )**

( अर्थात् क्रोधामुळे अविवेक उत्पन्न होतो. अविवेकाने स्मरणशक्ती भ्रष्ट होते, स्मरणशक्ती भ्रष्ट झाल्याने बुद्धीचा अर्थात् ज्ञानशक्तिचा नाश होतो. आणि बुद्धिचा नाश झाल्याने हा पुरूष आपल्या श्रेयस्थितीपासून अध:पतीत होतो. )

तुम्हाला राग आल्यावर तुम्ही काय करतात ? एक गोष्ट सांगू. एका कुटुंबात एक लाडका मुलगा होता. तो जी पण वस्तू मागायचा तर त्याच्या कुटुंबातील लोकं आणून द्यायचे. त्याच्या सर्व मागण्या पूर्ण करण्याची त्याला सवय झाली होती. शेवटी मागणी पूर्ण झाली नाही तर त्याला खूप राग यायचा. आता क्रोध करणे त्याचा स्वभाव झाला होता. सर्व लोकं त्याला खूप समजवायचे. पण मुलाचा राग अनियंत्रित होता. एकदा त्याच्या वडिलांनी एक युक्ति दाखविली. त्यांनी मुलाला खूप खिळे आणून दिले. आणि एक हतोडी दिली. "जेंव्हा तुला राग येईल तेंव्हा समोरच्या भिंतीवर एक खिळा मार" अशाप्रकारे पहिल्या दिवशी 40 खीळे झाले. दुसऱ्या दिवशी त्यापेक्षा कमी. असे हळूहळू खीळे कमी होऊ लागले. मुलाने वडिलांना सांगितले की आता त्याला राग कमी येतो. त्याच्या वडिलांनी त्याला एक दुसरे काम सोपविले. "आता जेव्हा तुला वाटेल की तुझ्या क्रोधावर तू नियंत्रण केले आहे तेव्हा ह्या पकडीने एक खीळा काढायचा." हळूहळू भिंतीवरून खीळे कमी होऊ लागले. सर्वच निघाले नाहीत पण जे निघाले. त्यांची निशाणी भिंतीवर राहिली. तेव्हा वडील म्हणाले की, "आपण जे क्रोधात बोलतो ते समोरील माणसाच्या हृदयात असे घाव पडतात." मुलाला सगळी गोष्ट समजली. तुम्हाला पण समजली असेल.

आता आणखी एक गोष्ट सांगतो असे अनेक लोकं असतात की जी अभ्यासात आणि जीवनात इतरांवर अवलंबून असतात. संपूर्ण वर्ष अभ्यास करीत नाहीत आणि वार्षिक परीक्षेचे वेळापत्रक आल्यावर शॉर्ट कट किंवा इतरांची मदत शोधत असतात. परंतु परक्याची आशा सदा निराशा. अनेक वयस्क लोक पण त्यांना लॉटरी लागेल आणि लवकर श्रीमंत होतील या आशेची वाट पाहतात. श्रीमद् भगवद्गीतेला हे आवडत नाही. गीता म्हणते की तुझा उद्धार तू स्वतःच कर. तूच तुझा मित्र आणि तूच तुझा शत्रू. तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार.

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**

**आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ( गीता 6.5 )**

( अर्थात् आपणच आपला संसार – समुद्रातून उद्धार करावा. आणि आपल्या आत्म्याला अधोगतीमध्ये ढकलू नये. कारण मनुष्य स्वतःच स्वतःचा मित्र आहे व स्वतः च स्वतःचा शत्रू आहे. )

अनेक विद्यार्थी आयोजन आणि दिनचर्ये विषयी चूकीचे असतात. वर्षाच्या सुखवातीला जास्त आराम करतात. आणि परीक्षेच्या वेळी जागरण करतात कित्येक मुले अस्वास्थ्यप्रद आणि जास्त आहारामुळे मेदस्विता सारख्या रोगांना बळी पडतात. व कित्येक विद्यार्थी परीक्षेच्या वेळी तणावामुळे कमी खातात तर काही खातच नाहीत असे करतात. गोतेची शिकवण समन्वयवादी आहे.

**युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।**

**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ ( गीता 6.17 )**

( अर्थात् दुःखाचा नाश करणारा योग तर यथायोग्य आहार-विहार करणाऱ्याचा, यथायोग्य कर्म करणाऱ्याचा आणि यथायोग्य निद्रा अथवा जागरण करणाऱ्याचा सिद्ध होतो. )

हे सर्व संतुलित ठेवण्याची गोष्ट आहे. गीताचा संदेश आहे की आहार, झोप आणि प्रवृत्ती योग्य प्रमाणात असावी. शिवाय तीन प्रकाराच्या आहाराचा तपशील गीतेत स्पष्ट आहे. वेळे अभावी इथे सगळे कसे सांगू ? सतराव्या अध्यायातील आठ ते दहाव्या श्लोकाचा अभ्यास करा.

माझ्या मते सर्वात महत्त्वाचा आणि शेवटचा मुद्दा सांगून मी शेवट करतो. अर्जुन सतत तेरा वर्ष युद्धाची तयारी करीत होता. मैदानात आला पण बरोबर. पण नातलगांना बघून विचार आला की युद्ध करू नये. तर या विचाराचा त्याच्या शरीर आणि मनावर काय परिणाम झाला ? अर्जुन म्हणतो, "माझे अंग शिथिल झाले आहे, तोंड कोरडे पडत आहे, शरीर थरथरते आहे, हातातून गांडीव पडत आहे, त्वचा जळत आहे, मन भ्रमित होत आहे, उभे राहू शकत नाही वगैरे."

गीतेच्या पहिल्या अध्यायात अर्जुनाने आपल्या स्थितीचे वर्णन केले आहे. तुम्हालाही कधी कधी परीक्षेत याचा अनुभव येतो का ? हा सर्व विचारांचा परिणाम आहे. अनेक वेळा प्रश्नपत्रिका हातात येण्याआधीच ती कठीण असेल आणि मला येणार नाही, अशी चूकीची धारणा आपण करतो. कमकुवत मन माणसाला कमकुवत करते. परीक्षेत किंवा जीवनाच्या कोणत्याही बाबतीत असे होत असेल तर गीता दुसऱ्या अध्यायच्या श्लोक 52 ते 72 मध्ये वर्णित स्थिप्रज्ञेचे गुण वाचले पाहिजे. चिंता, निराशा, हताशा वगैरे, अशा भावना आहेत ज्या आपल्या उर्जेचा नाश करतात. एक प्रश्न येत नसेल तर त्याच्या चिंतेत दुसरा प्रश्न विसरून जातो ? हात थरथरतात, पोटात काहीतरी होते बरोबर ना ? देवाने कमकुवत विचार काढून विधायक आणि तर्कशुद्ध विचार रुजवले आहेत. हीच तर श्रीमद् भगवद्गीता ! मी तुम्हाला अभ्यासात आणि तुमच्या जीवनात सर्वत्र यशस्वी होण्याच्या शुभेच्छा देतो. व थांबतो.

## स्वाध्याय

**1. येथे काही परिस्थिती दिल्या आहेत. अशा परिस्थितीत तुम्ही श्रीमद् भगवद् गीतेतून ऐकलेल्या कोणत्या गोष्टी तुम्हाला मार्गदर्शन करू शकतील त्याच्या समोर जोडा :**

| परिस्थिती | मार्गदर्शन |
|---|---|
| 1. अभ्यास, खेळ, आहार, टी. व्ही. इत्यादी सर्वच गोष्टींचे नियोजन केले पाहिजे. | • तद्विद्धि प्रणिपातेन... |
| 2. मी वर्गात अनेक प्रश्न विचारतो पण शिक्षकांसोबत बोलतांना मी माझी नम्रता विसरतो. | • ध्यायतो विषयानपुंस... |
| 3. वर्गात शिकलेल्या गोष्टी सरळ कंठस्थ न करता त्यावर चिंतन केले पाहिजे. | • उद्धरेदात्मनात्मानं... |
| 4. मी गृहकार्या सहित अनेक कामांमध्ये कोणावरतरी अवलंबून असतो. | • युक्ताहारविहारस्य... |
| 5. कोणी माझ्यावर टीका केली तर मी खूपच विचलित होतो. | • 17 व्या अध्यायात श्लोक 8 ते 10 |
| 6. मला हवी असलेली गोष्ट किंवा व्यक्ति मिळत नाही तेव्हा मी उदास होतो. | • स्थितप्रज्ञेचे गुण |

**2. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) गीता जयंती कोणत्या दिवशी असते ?

(2) अेमरर्सन यांना गीता भेट म्हणून कोणी दिली ?

(3) विद्यार्थी म्हणून अर्जुनचा कोणता गुण तुम्हाला आवडला ?

(4) विद्यार्थ्यांमध्ये कुतुहलासह कोणते गुण आवश्यक आहेत ?

(5) विषयाचे ध्यान → आसक्ति → ही साखळी पुढे वाढवा.

3. **थोडक्यात उत्तरे द्या :**

1. क्रोधाचे कारण आणि परिणाम कोणते असतात ?
2. 'बुद्धिचा नाश म्हणजे माणसाचा स्वत:चा नाश' समजवा.
3. शरीर आणि मनावर विचारांचा काय परिणाम होतो ?
4. पाठात दिलेल्या श्लोकांपैकी तुम्हाला कोणता श्लोक जास्त आवडला ? कारण सांगा.

## विद्यार्थी-प्रवृत्ती

- श्रीमद् भगवद् गीतेमधून पहिल्या अध्यायच्या श्लोक एकोणतीस ते एकतीसमध्ये कमकुवत विचारांचा शरीर आणि मनावर झालेल्या परिणामाचे अर्जुनाने केलेले स्वत:च्या स्थितीचे वर्णन वाचा.
- या एकमात येणाऱ्या श्लोकांचा लय आणि शुद्ध उच्चार शिक्षक किंवा इन्टरनेटच्या मदतीने शिका. व त्याचे गायन करा.

## शिक्षकाची भूमिका

- स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, म.गांधीजी, विनोबा भावे. इत्यादि भारतीय क्रांतिकारकांच्या जीवनावर श्रीमद् भगवद्गीतेचा प्रभाव दर्शविणारे प्रसंग विद्यार्थ्यांना सांगावे.
- पाठात येणारे श्लोक विद्यार्थ्यांना लय आणि शुद्ध उच्चारासह गाऊन त्याचा भावर्थ सांगावा.
- 'गीतामृतम्' (सद्विचार दर्शन प्रकाशन) मधील अध्याय 1 चे वाचन करून विद्यार्थ्यांना परिचय द्यावा.

## 25 समर्पण

श्रीमद् भगवद्गीता हा कर्मयोग, भक्तियोग आणि ज्ञानयोगाचा त्रिवेणी संगम आहे. वैशिष्ट्य म्हणजे त्रिवेणी-मध्ये गंगा-यमुना-सरस्वती तीनही प्रवाह एकत्र असून सुद्धा स्पष्टपणे वेगळे वाटतात. परंतु येथे अद्वैतभावापासून अनोन्य-आश्रित राहून ऐकमेंकांसोबत असे अनन्य झाले आहेत की तीनही अविभाज्यपणे एकत्र वाटतात. 7 ते 12 व्या अध्यायात विशेषत: भक्तियोगला तपशीलवार समजविले आहे. श्रीमद् भगवद्गीतेत निरूपित भाक्ति विशेष आहे. कारण की येथे आपले कर्म हेच भक्तिच्या रूपाने प्रकट होते. या ग्रंथात वर्णन केलेला भक्तियोगाचा मार्ग समजून घेतल्यास तो कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही वेळी हितकारक आणि मार्गदर्शक ठरतो.

गीतेमध्ये वर्णन केलेला भक्तियोग समजून घेण्यापूर्वी भक्त आणि भक्ति या शब्दांच्या पारिभाषिक संज्ञा समजून घेणे आवश्यक आहे.

एक भक्त जो आपली वैयक्तिक आसक्ती सोडून देतो आणि संपूर्ण विश्वाच्या स्थूल चैतन्यामध्ये व्याप्त असलेल्या परमात्म्याच्या सर्वव्यापकतेच्या संबधात परमेश्वरासाठी कार्य करतो. गरूडपुराणात भक्ति संदर्भात म्हटले आहे की,

**भज इत्येष वै धातुः सेवायां परिकीर्तितः ।**

(अर्थात् भक्ति शब्द भज् क्रियापदापासून बनला आहे ज्याचा अर्थ सेवा आहे.) हा अर्थ भक्ति शब्दाचा जो पूजा-पाठ असा मर्यादित अर्थ करतो परंतु त्यापेक्षा विशाल व मुक्त आहे. या अर्थात समर्पण भावाने झालेल्या लोकहिताच्या कोणत्याही कार्याला सामावून घेतले आहे. समजदारपणे केलेली सर्व कामे निष्ठापूर्वक, समर्पणाच्या भावाने करण्यात आली तर ते भक्तिच्या परिभाषेत येते. या गोष्टीला भगवद्गीता या रीतीने समजविते.

**ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परा: ।**

**अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ॥ ( गीता 12.6 )**

(अर्थात् परंतु जे मत्परायण राहणारे भक्तजन सर्व कर्मे मला अर्पण करून मज सगुणरूप परमेश्वरालाच अनन्य भक्तियोगाने निरंतर चिंतन करीत भजतात.)

या श्लोकाचे तात्पर्य हे आहे की आपले सर्व कार्य 'ईश्वर साक्षी' आहे. या भावनेने केले पाहिजे. आणि आपले कार्य परमपिता भगवंताला समर्पित करायचे आहे असा दृढ निश्चय करून कार्य केले तर ते स्वाभाविकपणे होईल. उदाहरणार्थ स्वयंपाकघरात तयार झालेले अन्न सरळ आपल्या ताटात आले तर ते फक्त भोजन म्हटले जाईल. परंतु जेव्हा ते परमेश्वराला अर्पण केले जाते तेव्हा तो प्रसाद बनतो. आता आपण जो रोज स्वयंपाक करतो तो परमेश्वराला अर्पण करायचा आहे, परमेश्वरासाठीच आहे अशा निष्ठेने तयार केला तर तो स्वयंपाक सहजपणे पवित्रतेने आणि सद्भावनेने परिपूर्ण होईल. या कर्मात शारीरिक परिश्रमासोबत मानसिक समर्पणाचे मिलन म्हणजे योगच भक्ति घडवतो.

काहीही अर्पण करण्याची वेळ आली की लगेच श्रीमद् भगवद्गीतेतील हा श्लोक मनात येतो.

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।**

**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ ( गीता 9.26 )**

(अर्थात् जो कोणी भक्त माझ्यासाठी फुले, पाने, फळे व जल इत्यादि प्रेमाने अर्पण करतो, त्या शुद्धबुद्धी निष्कामप्रेमी भक्ताने प्रेमपूर्वक अर्पण केलेले ते पत्र-पुष्प इत्यादी मी सगुणरूपाने प्रगट होऊन प्रेमपूर्वक ग्रहण करतो.)

जेव्हा आपण हा श्लोक वाचतो तेंव्हा आपल्याला एक गोष्ट समजली पाहिजे की देव तर ब्रह्मांडात सर्वांत महान आहे पण त्याला भावाने लहान वस्तू दिली तरी तो, त्याची दखल घेतो. व प्रसन्न होतो. त्यामुळे आपल्या मित्राचा वाढदिवस, लग्नप्रसंगी किंवा इतर कोणत्याही प्रसंगी काही मुलांना स्वस्त भेटवस्तू देण्यात कमीपणा जाणवतो. आई-वडिलांना महागड्या भेट वस्तू आणण्या साठी हट्ट करतात की सगळे अशा महागड्या वस्तू देतील व मी स्वस्त वस्तू भेट देईल तर तुच्छ समजला जाईल. तेव्हा देणारा आणि घेणारा या ज्ञानाने माहितगार असतील तर कोणतीही वस्तू मनाच्या शुद्ध भावनेने जुडलेली असेल तर ती उत्कृष्ट, अतुलनीय होते. तर ते दोघेही एक देणारा व दुसरा घेणारा दोघांनाही अभिमान वाटेल.

आपल्या आदान-प्रदान कार्यात, दैनंदिन व्यवहारात, कर्तव्यात सद्भावना असली पाहिजे. हा सद्भाव लगेच साकार होत नाही. तर त्याचा सराव करावा लागतो. परमात्मा श्रीकृष्ण सरावाची अनिवार्यता दर्शविण्यासाठी सांगतात.

**अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।**

**अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनञ्जय ॥ ( गीता 12.9 )**

( अर्थात् जर तू माझ्यामध्ये मन स्थिर करण्यास समर्थ नसशील तर हे अर्जुन ! अभ्यासरूप योगाद्वारे मला प्राप्त होण्याची इच्छा कर. )

आपल्या मनाला परमात्म्याशी जोडून काम करण्याविषयी बोललो आहोत. परंतु मन अति वेगवान घोड्यासारखे आहे. त्यावर नियंत्रण ठेवणे कठीण आहे. पण अशक्य नाही. अर्जुन स्वतः म्हणतो की "चंचलं हि मनः कृष्ण !" मन खूप चंचल आहे. ज्या विद्यार्थ्याला पक्ष्याच्या डोळ्याशिवाय दुसरे काहीही दिसत नाही असा एकाग्रचित्त असणारा विद्यार्थी असे म्हणतो की मन चंचल आहे. तर त्याचा उपाय आपल्याला कळायलाच पाहिजे.

त्याचे निराकरण अभ्यासानेच होईल. अभ्यास म्हणजे ( चित्तस्य सर्वतः समाहृत्य पुनः पुनः स्थापनम् अभ्यासः ) चित्ताला वारंवार एकाच जागी जोडून, एकच कार्य सतत प्रयत्नांनी आणि कठोर परिश्रमाने करत राहणे. असे एकाच गोष्टीच्या सतत अभ्यासाने एकाग्रता वाढते. आज शिकलेला पाठ एकाच वेळात चांगल्या प्रकारे समजून तयार होत नाही. परंतु त्याला पुन्हा पुन्हा वाचून समजण्याचा प्रयत्न करावा, संपूर्णपणे त्याचा अभ्यास झाला, तर तो दृढ होतो. व परिक्षेत हवा तसा परिणाम येतो. हे आहे अभ्यासाचे महत्त्व. कोणत्याही कार्यसिद्धी साठी अभ्यास खूप आवश्यक असतो.

दुसऱ्या एका उदाहरणाद्वारे हिच गोष्ट अधिक दृढ केली तर कोणताही एखादा वैज्ञानिक त्याचे संशोधनाचे काम सुरू करतो तेव्हा ते कार्य म्हणून त्याचा स्वीकार करतो. परंतु त्याची सतत प्रवृत्ती, आणि चिंतन-मनन त्याला या कार्यामुळे नवीन ओळख मिळते. ही ओळख अभ्यासाचा परिणाम आहे. विद्यार्थी शिकूण एखादी नोकरी किंवा व्यवसाय करतो. तो स्वीकरतो तेव्हा सुरूवातीला तो फक्त अर्थ उत्पादनाच्या हेतूने, स्वताच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आहे असे मानतो. परंतु हळूहळू वारंवार एकाग्र चित्ताने हे काम करता करता त्याचे हे काम फक्त सामान्य कार्य न राहता त्याची ते ओळख बनते. ते कार्य त्याच्या जीवनाचा पर्याय होतो. हे पुन्हा पुन्हा प्रयत्न केल्यामुळे होते. पहा लहान लहान खड्डे पन्नास ठिकाणी खोदले तरीपण पाणी लागत नाही परंतु एकच ठिकाणी सतत खोदल्यामुळे विहिर बनते व विहिरीतून पाणी बाहेर निघते. हिमालयामधून निघणारा छोटा प्रवाह एकाच रस्त्याने आणि सतत धावत राहतो तेंव्हा तो हरिद्वारला पोहचे पर्यंत खळाळणारी गंगा नदी होते. त्यामुळे सतत अभ्यास करणे आवश्यक आहे.

जर अभ्यास अवघड वाटत असेल तर भगवद्गीतेत दुसरा मार्गही सांगितला आहे.

**अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।**

**सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ( गीता 12.11 )**

( अर्थात् जर माझ्या प्राप्तीरूपी योगाचा आश्रय घेऊन वरीलप्रमाणे साधना करण्यातही तू असमर्थ असशील तर मन बुद्धी इत्यादी वर विजय प्राप्त करणारा होऊन सर्व कर्मांच्या फळाचा त्याग कर. )

या श्लोकात (1) मद्योगमाश्रितः (माझ्याशी जुळलेला) (2) यतात्मवान् (स्वाधीन चित्त असणारा) - हे दोन्ही पदे एकमेकांना पूरक असून सुद्धा विरोधाभासी आहेत असे वाटते परंतु ते समजले.तर आपल्या जीवनामध्ये प्रत्येक प्रवृत्तीमध्ये आत्मबळ मिळते. सध्या आपण पाहतो की कामाचा स्वीकार केल्यानंतर पुष्कळवेळा आपल्यामध्ये आत्मवविश्वासाची उणीव भासते. कार्य मोठे, आव्हान मोठे आणि आपण त्यासमोर स्वतः:ला कमकुवत व अशक्त वाटू लागतो. परंतु हत्तीच्या आकाराएवढा आकार अंकुशचा नसतो. अंधारा एवढा दिवा नसतो. कुलुपा एवढी चावी नसते तरी सुद्धा ते यशस्वी होतात. परमेश्वर आपल्या बरोबर आहे, आपण एकटे नाही हे लक्षात ठेवावे. परमेश्वर बरोबर आहे तर तो करून घेईल असेही मानू नये, आपण स्वाधीन चित्त असणारे स्वतंत्र आहोत. असे मानावे, आपण कर्म केले तर परमेश्वर मदत करेल. आपले काम आपल्यालाच करायचे आहे, त्याला मनापासून करायचे आहे. जर असे केले तर परमेश्वर आपल्याला नक्कीच मदत करेल.

परिणामी प्रत्येक काम अशा प्रकारे केले तर काम पूर्ण झाल्यानंतर कामाचा थकवा जाणवत नाही. परंतु समर्पण भावनेने काम केल्याचे समाधान मिळते. आपल्याला हलकेपणा व प्रसन्नतेचा अनुभव येतो.

अशारितोने काम करणाऱ्या व्यक्तिला परमात्म्याचे अधिक सान्निध्य प्राप्त होते. जे आपण भक्ताच्या विशेषणावरून जाणू शकतो.

**संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ ( गीता 12.14 )**

( अर्थात् जो योगी निरंतर संतुष्ट आहे, मन इंद्रियांसह शरीराला वश केलेला आहे. आणि माझ्यामध्ये दृढ निश्चय असणारा आहे. तो माझ्यामध्ये मन बुद्धी अर्पण केलेला माझा भक्त मला प्रिय आहे. )

**तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी सन्तुष्टो येन केनचित् ।**
**अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ ( गीता 12.19 )**

( अर्थात् जो निंदा व स्तुतीला समान मानणारा, मननशील आणि कोणत्याही प्रकारे शरीराचा निर्वाह होण्यात सदैव संतुष्ट आहे. तसेच राहण्याच्या स्थानाविषयी मोह व आसक्तिरहित आहे – असा स्थिरबुद्धिचा भक्तिमान पुरूष मला प्रिय आहे. )

या श्लोकातून ''संतुष्ट'' पद सांगते की आपल्या क्षेत्रात आपण खूप कार्य करावे परंतु कोणतीही इच्छा ठेऊन काम करू नये. जे उपलब्ध आहे ते पुरेसे आहे. जे सहज मिळते त्यावर समाधानी राहिल्याने तणाव, नैराश्य सारख्या दुर्बल मानसिकते पासून वाचू शकतो. समाधान नसेल तर इंद्राचे सिंहासन पण कमी पडते. जास्त असंतोषामुळे आपल्याकडे जे आहे त्याचा पण आपण आनंद घेऊ शकणार नाही.

श्लोकात एक पद आहे ''दृढनिश्चय'' (अर्थात् दृढ निर्णय असणारा) आपण रात्री झोपण्यापूर्वी विचार करतो की सकाळी ब्रह्म मुहूर्तावर उठून व्यायाम, योग, अभ्यास-पूजापाठ करेल. असा निर्णय करतो परंतु सकाळी अलार्म वाजला की आपण तो बंद करून पुन्हा झोपतो असे होते. परंतु आपला निश्चय दृढ असला तर तो पुन्हा झोपू देणार नाही. आपण आपल्या स्वतः ला अशी सुट दिली नाही व दृढ निश्चयी झालो तर आपण निश्चित केलेले साध्य करू शकतो. विद्यार्थी जीवनात दृढ निश्चयाचे खूप महत्त्व आहे. त्यानंतर ''तुल्यनिन्दास्तुतिः'' हे पद पण खूपच समजण्यासारखे आणि जीवनात उतरविण्यासारखे आहे. भगवद्गीतेत ही गोष्ट अनेकवेळा सांगण्यात आली आहे की निंदा आणि स्तुतीला समान रीतीने स्वीकारा. यात निंदा ( टीका ) शब्द अगोदर आहे. कारण की जीवनात टीकेला सामोरे जाण्याची तयारी अधिक ठेवावी लागते. ज्याला टीकेची भीती वाटते तो यशस्वी होऊ शकत नाही. सोशल मीडीयावर कोणी तुमच्या विरोधात कोमेंट केली, लाईक कमी मिळाले, तुम्हाला फटकारले असेल किंवा दोन वाक्ये बोलले असेल तर आपल्याला ते लागते, ते सहन करू शकत नाही. तेव्हा भगवद्गीता म्हणते की निंदा ऐकण्यापासून मागे सरू नये. आपण संघर्ष केला तर अभ्युदयला प्राप्त करू शकतो.

या रितीने भगवद्गीते मध्ये खूप सुंदर प्रकारे वर्णन केले आहे. आपण प्रत्येक कर्माला परमेश्वर अर्पण भावाने केले तर या समर्पण भावाने केलेले उत्तम कार्य भक्तियोगात परिणत होते.

जीवनात जे काही कर्तव्य करायचे आहे ते सर्व व्यापक परमात्मा विषयी सर्मपण भावाने केलेले कार्य लोकहिताचे काम होते. हिच उत्तम भक्ति आहे.

## शब्दार्थ

**अद्वैत** - अभिन्न, **समर्पण** – संपूर्ण निष्ठने अर्पण केलेले, **अभ्यास** – वारंवार प्रवृत्ती करणे, **लघुता** - उणीव.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) भगवद्गीता कशाचा त्रिवेणी संगम आहे ?

(2) भज् धातुचा मूळ अर्थ काय आहे ?

(3) अभ्यास शब्दाचा अर्थ सांगा.

**2. या पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(1) पत्र, पुष्प, फळ, जळ अर्पणाचा प्रसंग कोणता बोध देतो ?

(2) अभ्यासाचे काय महत्त्व आहे ? उदाहरण देऊन सांगा.

(3) भक्तियोगचे वर्तमान संदर्भात महत्त्व समजवा.

## विद्यार्थी-प्रवृत्ती

(1) श्रीमद् भगवद्गीतेचा अध्याय-12 मध्ये येणाऱ्या श्लोकांचे लयबद्ध, छंदबद्ध स्वरात गायन करा.

(2) समर्पणभावाला व्यक्त करणारे श्लोक भगवद्गीतेमधून शोधा व सुवाच्य अक्षरात लिहा.

## शिक्षक-प्रवृत्ती

(1) अध्याय-12 चे गायन यति नियमांना लक्षात ठेऊन अनुष्टुप छंदाच्या नियमा प्रमाणे शिकवावे.

(2) भक्ति संदर्भातील श्लोक शोधून विद्यार्थ्यांना द्यावे.

(3) भगवद्गीतेमधून लहान विषय देऊन प्रवृत्या, प्रवचन, संवाद वगैरे करावे.

(4) भगवद्गीतेचा समर्पण भाव वर्तमान परिप्रेक्ष्यमध्ये किंवा अध्ययन प्रवृत्तीमध्ये कशा रितोने मदतरूप होईल ते दृष्टांत देऊन समजवा.

# 26 राष्ट्रभक्तिची संजिवनी

'श्रीमद् भगवद्गीता' हा वेद आणि उपनिषदांचे मानवाला व्यावहारिक ज्ञानात प्रबोधन करणारा सारग्रंथ आहे. मातृभूमीसाठी प्राण अर्पण करणाऱ्या हुतात्म्यांना प्रेरणा व प्रोत्साहन देणारा हा ग्रंथ आहे. साहस, शौर्य, वीरता, धैर्य आणि बलिदानाच्या भावनेला अविर्भाव आणि सिंचन करणारा हा ग्रंथ आहे. गीतेच्या महानतासह देशभक्त, लाल, बाल, पाल, सुभाषचंद्र बोस, गांधीजी इत्यादिंनी. सशस्त्र आणि अहिंसक चळवळींना प्रेरणा दिली आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनात गीतेने कशाप्रकारे मनोबल दिले आहे. त्याचे नमूनेदार रितीने या प्रेरक निबंधात सदृष्टांत प्रस्तुत केले आहे.

18 अध्याय आणि 700 श्लोकांनी बनलेली श्रीमद् भगवद्गीता हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. गीतेचा मुख्य उदेश्य हा मानवजातीचे कल्याण आहे, जे केवळ विशिष्ट धर्म, जात किवा व्यक्तिसाठी नाही. तर संपूर्ण मानवजातीसाठी कल्याणकारी आहे. कोणताही देश, संप्रदाय, समुद्राय, जातीचा किवा वर्णाचा व्यक्ति असू द्या, जर तो गीतेचे थोडेफारही अनुसरण करेल तर त्याचे जीवन सार्थक होईल. या गोष्टीची साक्ष देणाऱ्या हुतात्म्यांच्या मालिकेचे भारताच्या गौरवशाली इतिहासात वर्णन केले आहे.

शतकानुशतके. भारतातील लोक गीतेच्या ज्ञानात ओतप्रोत व मग्न आहेत. भारतीय संस्कृतीच्या कुशीत वाढलेले वीर, वीरांगना आणि महापुरूषांनी अथक परिश्रमाने संस्कृतीचे रक्षण, संवर्धन केले आहे.

भारताच्या गौरवशाली इतिहासाचे आपण साक्षीदार आहोत की भारतावर वेळोवेळी अनेक परकीय राष्ट्रांनी आक्रमणे केली असली तरी आपण संस्कृतिचे जतन केले आहे. विश्वमांगल्याची भावना असणारी भारतीय संस्कृती जिवंत ठेवली आहे. याचे एक भक्कम कारण म्हणजे भारताला सुरक्षित, अखंडित, आणि स्वतंत्र बनविण्यासाठी अनेक महापुरूषांनी विश्व मांगल्याच्या भावनेने ओतप्रोत अशा गीताज्ञानाचा अवलंब केला आहे. गीतेच्या ज्ञानाच्या महासागरात डुबीकी मारून, स्वत:च्या वैयक्तिक भावनेला गीतेच्या रंगात रंगवून राष्ट्रीय भावनेत रूपांतरित केले आहे. स्वातंत्र्यलढ्यातील वीरांना जेंव्हा फाशीची शिक्षा देण्यात आली होती तेव्हा त्यांनी गीताज्ञानाच्या बळावर हसतमुखाने हुतात्म्य पत्करले होते. गीतेचे हे श्लोक आत्मबळ देतात.

**य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ।**
**उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ ( गीता 2.19 )**

(अर्थात् जो या आत्म्याला मारणारा समजतो आणि जो याला मृत मानतो, ते दोघेही अज्ञानी आहेत कारण हा आत्मा खरे पाहता कोणाला मारीत नाही आणि कोणाद्वारे मारलाही जात नाही.)

**नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।**
**न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुत: ॥ ( गीता 2.23 )**

(अर्थात् या आत्म्याला शस्त्रे कापू शकत नाहीत, याला अग्नी जाळू शकत नाही, याला पाणी भिजवू शकत नाही आणि वारा सुकवू शकत नाही.)

गीता ज्ञानाला आत्मसात करणारे वीर 'भारत माता की जय'-च्या जोरदार घोषणा देऊन 'मातृभूमीसाठी' शहीद व्हायचे. एक फाशीवर चढला तर त्याच वसाहतीतून इतर अनेक शूर-बहादूर बाहेर येत होते - असाच एक शूर पुरूष म्हणजे खुदीराम बोझ. यांचा जन्म 3 डिसेंबर 1889 रोजी पश्चिम बंगालच्या मीदनापूर जिल्ह्यात झाला होता. त्यांनी गीताचा आश्रय घेऊन देशभक्तिची गीते गाता गाता वयाच्या 19 व्या वर्षी स्वातंत्र्य लढयात प्राणाची आहुति दिली. बंगभंग चळवळीत सहभागी झालेल्या खुदीराम बोस यांना जेंव्हा

मुझफ्फरपुरच्या तुरूंगात इ.स. 1908 मध्ये फाशी दिली तेव्हा त्यांच्या हातात होती "श्रीमद् भगवद्गीता". या महाग्रंथात निरूपित आत्म्याचे अमरत्व त्यांनी आत्मसात केले होते.

**अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।**

**नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ ( गीता 2.24 )**

( अर्थात् हा आत्मा अच्छेद्य आहे, हा आत्मा न जाळता येणारा, न भिजविला जाणारा आणि न सुकविता येणारा असा आहे, तसेच हा आत्मा नित्य, सर्वव्यापी, अचल, स्थिर राहणारा आणि सनातन आहे. )

युवाहृदयसम्राट वीर भगतसिंह यांना एप्रिल 1929 मध्ये नॅशनल अॅसेम्बलीमध्ये बॉम्ब फेकल्याबद्दल तुरूंगात टाकण्यात आले. तेव्हा त्यांनी तुरूंग प्रशासनाकडे श्रीमद् भगवद्गीता मागितली होती. ही बाबत तत्कालीन इंग्रजी दैनिक "द ट्रिब्यूनल" मध्ये छापण्यात आली. त्याचे शीर्षक होते. "S. Bhagatsinh wants Geeta". भगतसिंह यांना तुरुंगात देण्यात आलेली गीता आजही लाहोरच्या "शहीद-ए-आझम" नावाच्या संग्रहालयात ठेवण्यात आली आहे. ज्यावर वीर भगतसिंग यांची सही (हस्ताक्षर) पहावयास मिळते.

डाव्या हाताने उजव्या बाजूच्या मिशीला पीळ देणाऱ्या प्रतिमेशी आपण सर्व परिचित आहोत. ते आहेत महान देशभक्त क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद. नेहमी ते डाव्या खांद्यावर यज्ञोपवीत, खिशात गीता आणि कमरेला पिस्तुल ठेवत. जेव्हा ते गुप्त वासात राहून स्वातंत्र्यासाठी ब्रिटीश क्रूरता विरोधात संघर्ष करीत होते त्या काळातही ते गीतेचे नित्य स्तवन करायचे. ते अत्यंत कट्टर प्रतिज्ञापालक होते. त्यांचा सदाचार आणि रोमारोमात व्याप्त बहादूरीचे अनेक प्रसंग प्रचलित आहेत. या सद्गुणांचा प्रेरणास्त्रोत गीता होते.

गीता तत्कालीन क्रांतिकारकांसाठी मनोबल वाढवणारी ठरली आणि त्यांच्या स्वतंत्र्य चळवळीचा तात्त्विक आधार बनली.

**स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि ।**

**धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥ ( गीता 2.31 )**

( अर्थात् आणि आपल्या धर्माकडे पाहून देखील तू भयभीत होणे योग्य नाही. कारण क्षत्रियांसाठी स्वधर्मोचित असे युद्ध करण्यापेक्षा कल्याणकारी असे दुसरे कोणतेही कर्तव्य नाही. )

एक महान वीर योद्धा सुभाषचंद्र बोस. 'नेताजी' च्या टोपन नावाने ओळखले जातात. ते नेहमी स्वत: सोबत गीता ठेवत. रोज सकाळी नित्यकर्म केल्यावर गीतेचा अभ्यास करायचे. गीता अध्ययनामुळे त्यांच्यात अटलता, साहसिकता आणि निर्भयता सारख्या गुणांच्या विकास झाला होता. नेताजींनी 'आझाद हिंद सेना' तयार करून इंग्रजांच्या सैन्यला पराभूत केले होते. या फौजेचे कॅप्टन एस.एस. यादव सांगतात की एकदा भयंकर गोळीबारातही नेताजी जरा सुद्धा विचलित झाल्याशिवाय लढले होते. नेताजीचे हे धैर्य व साहस पाहून इतर साथीदार पण उत्साहात येऊन शेवटपर्यंत लढले होते. कारण की त्यांनी गीतेचे हे सत्व आत्मसात केले होते.

**सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।**

**ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ ( गीता 2.38 )**

( अर्थात् सुख-दु:ख, लाभ-हानी आणि जय-पराजय यांना समान समजून युद्धासाठी तू तयार हो. अशा प्रकारे युद्ध केल्यास तुला पाप लागणार नाही. )

''लाल, बाल आणि पाल'' या त्रिकुटाने स्वतःच्या राष्ट्रवादी विचारधारेशी एकरूप बनून भारतात स्वातंत्र्य चळवळीचा भक्कम पाया उभारण्यात अविस्मरणीय योगदान दिले आहे.

''लाल'' म्हणजे पंजाब केसरी म्हणूंन ओळखले जाणारे, सायमन कमिशन विरूद्ध विद्रोह करणारे महान सूत्रधार होते लाला लजपतराय. त्यांनी गीता अध्ययन करून त्याच्या मर्मा पर्यंत पोहचले होते. याला त्यांच्याच शब्दांची पुष्टी मिळते :

''गीतेचे मुख्य मार्मिक तत्व हे आहे की जगात कितीही बाह्य विरोध, विषमता, असंबद्धता असली तरी या सर्व विषमते मध्ये एक अखंड एकता, एक नित्य पूर्णता आहे. कर्तव्य आणि भावात जो विरोध पहावयास मिळतो तो केवळ देखाव्या पुरताच असतो. मुळात दोन्ही एकच आहेत. गीता या महान तत्वाला अतिशय सुंदर आणि प्रभावी पद्धतीने व्यक्त करते.''

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**

**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥ ( गीता 2.47 )**

( अर्थात् तुझा कर्म करणे एवढाच अधिकार आहे, त्याच्या फळांमध्ये कधीही नाही. म्हणून तू कर्माच्या फळांची इच्छा करू नकोस आणि तुझी कर्म न करण्याचीही आसक्ती नसावी. )

या त्रिपुटीतील दुसरा ''बाल'' जो लोकप्रिय स्वातंत्र्य सैनिक होता त्यांचे टोपन नाव होते. ''लोकमान्य''. ''स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे. आणि तो मी मिळवणारच'' हे सूत्र देणाऱ्या लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांना जेंव्हा इंग्रज सरकारने देशद्रोहाच्या आरोपाखाली मंडालेच्या तुरूंगात कैद केले तेव्हा त्यांनी ''गीता-रहस्य'' नावाच्या पुस्तकाची रचना केली होती. त्यात त्यांनी श्रीमद् भगवद्गीताच्या कर्मयोगाची बृहद् व्याख्या केली आहे. या पुस्तकात हे तात्त्विक विचार सांगितले आहेत की आपण मुक्तिकडे दृष्टी ठेऊन त्यासोबतच सांसारिक कर्तव्य केले पाहिजेत. या पुस्तकात त्यांनी माणसाने त्याच्या सांसारिक जीवनात वास्तविक कर्तव्याचा बोध केला आहे. जे अर्जुनाला निमित्त बनवून श्रीकृष्णाने सांगितले आहे....

**नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।**

**शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ ( गीता 3.8 )**

( अर्थात् तू शास्त्रविहित कर्तव्यकर्म कर, कारण कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे श्रेष्ठ आहे. आणि कर्म न केल्याने तुझा शरीर निर्वाहसुद्धा सिद्ध होणार नाही. )

त्रिपूटीचे तिसरे स्वातंत्र्यसैनिक म्हणजे ''पाल''. बिपिनचंद्र पाल 'बंगालचा वाघ' म्हणून ओळखले जातात. त्यांनी उपनिषद, गीता सारख्या ग्रंथांचे गहन अध्ययन केले. त्यामुळेच त्यांनी जातीवाद आणि इतर सामाजिक कुप्रथांचा कडाडून विरोध केला होता. गीता ज्ञानाने प्रभावित होऊन ते एक उत्तम वक्ता शिक्षणतज्ज्ञ आणि स्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते बनले.

आशाप्रकारे 'लाल-बाल आणि पाल' या त्रिकुटाच्या स्वातंत्र्यलढयाच्या महायज्ञाच्या मूळाशी गीतेच्या निष्कामतेचा हा बोध होता.

**एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।**

**अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ ( गीता 3.16 )**

(अर्थात् हे पार्थ ! जो पुरूष या लोकी अशा प्रकारे परंपरेने प्रचलित असणाऱ्या सृष्टीचक्राला अनुसरून वागत नाही अर्थात् शास्त्रानुसार कर्मे करीत नाही, तो इंद्रिय-सुखात निमग्न पापी पुरूष व्यर्थच जीवन जगतो.)

ही गोष्ट होती सशस्त्र स्वातंत्र्यसैनिकांचे आत्मबळ, निर्भयता आणि गीताज्ञानाच्या संबंधाची. परंतु अहिंसेच्या मार्गाने भारताला स्वातंत्र्य देण्याचे श्रेय ज्यांच्या शिरावर आहे ते भारताचे राष्ट्रपिता गांधीजी आहे. ते गीतेचे परम उपासक होते. महात्मा गांधीजी म्हणतात, "मी जेंव्हा हताश, निराश आणि चिंताग्रस्त होतो तेव्हा मी माता गीतेचा आश्रय घेतो." गांधीजींच्या जीवनावर श्रीमद् भगवद्गीतेच्या सखोल ज्ञानाची अमिट छाप होती. गांधीजीनी गीतेचा 'अनासक्ति योग' चा गुजराती अनुवाद केला आहे

.महात्मा गांधीनी श्रीमद् भगवद्गीतेला विश्वधर्माचे एक पुस्तक म्हटले आहे. गीतेमध्ये सहज पणे गहन मूल्ये सांगितले आहेत. या मूल्यांचा गांधीजींच्या जीवनावर आणि व्यक्तिमत्वावर खोलवर परिणाम झाला होता. गांधीजी स्वतः म्हणतात की, "माझ्या मते, गीता समजण्यासाठी खूप सोपे पुस्तक आहे. यात काही मूलभूत समस्या मांडण्यात आल्या आहेत. ज्याचे निराकरण निःसंशयपणे सहज अवघड आहे. परंतु गीता सर्वसाधारण पणे माझ्या मते दिव्यासारखी स्पष्ट आहे. कोणत्याही प्रकारच्या स्थापित विवादापासून ती मुक्त आहे. ती बुद्धी आणि हृदय दोघांनाही संतुष्ट करते. त्यात तत्वज्ञान आणि भक्ति दोन्हीही परिपूर्ण आहे. तिचा परिणाम सार्वत्रिक आहे व भाषा अगदी सोपी आहे.

गांधीजींचे आध्यात्मिक उत्तराधिकारी मानले जाणारे भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांनी गीतेवर अनेक प्रवचने दिली. त्यांची पुस्तके "गीता-प्रवचन" आणि "गीता चिंतनिका" आजही लोकप्रिय आणि चिंतनीय आहेत. विनोबाजींनी गीता महिमाचे स्पष्ट शब्दात वर्णन केले आहे की - "माझे शरीर आईच्या दूधावर जितके अवलंबून आहे त्यापेक्षा खूप जास्त माझे हृदय आणि बुद्धित्वे पोषण गीतेच्या दूधाने झाले आहे. श्रद्धा आणि प्रयोग या दोन पंखांच्या जोरावरच मी गीता गगनात ताकदीने उडत राहिलो. गीता माझा आत्मा आहे. जेव्हा मी गीतेच्या संदर्भात कोणाशी बोलतो तेव्हा गीतासागर पार करतो. आणि जेव्हा एकटा असतो तेव्हा तिच्या अमृतसागरात खोलवर डुबकी मारून येतो."

अशा प्रकारे भारताला स्वतंत्र करण्यासाठी अनेक महापुरूषांनी लोकहितासाठी आपले जीवन समर्पित केले. त्याच्या मूळाशी गीतेच्या या श्लोकाची प्रेरणा सामावलेली असेल.

**कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।**
**लोकसंग्रहमेवापि सम्पश्यन्कर्तुमर्हसि ॥ ( गीता 3.20 )**

(अर्थात् जनकादी ज्ञानी पुरूष सुद्धा आसक्तीरहित कर्माद्वारेच परमसिद्धीस प्राप्त झाले आहेत. म्हणून लोकसंग्रहाचा विचार करून तू देखील कर्म करणेच योग्य आहे.)

भारतीय संसस्कृतीचे रक्षक आणि पालनपोषण करणारे नामी-अनामी स्वातंत्र्य सैनिकांनी आणि या सर्वच महापुरूषांनी भगवद्गीतेचे अध्ययन व अनुसरण करून समाजा समोर एक आदर्श निर्माण केला. आपल्यासाठी या महापुरुषांचे जीवन आणि गीताज्ञान अनुकरण करण्यासारखे आहे.

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ ( गीता 3.21 )**

(अर्थात् श्रेष्ठ पुरूष जे जे आचरण करतो अन्य पुरूषही त्याचप्रमाणे आचरण करतात. तो जो काही आदर्श लोकांपुढे ठेवतो, त्यानुसारच सर्व मनुष्य समुदाय कार्य करू लागतात.)

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) नेताजी सुभाषचंद्र बोझ यांचा नित्य काय नियम होता ?

(2) लाल, बाल आणि पाल 'त्रिपुटीचे' नाव सांगा.

(3) लोकमान्य टिळकांनी लोकांना कोणते सूत्र दिले ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) भगवद्गीते विषयी गांधीजीचा अभिप्राय सांगा.

(2) लोकमान्य टिळकांच्या मते गीतेचे तात्पर्य काय आहे ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) स्वातंत्र्य सैनिकांच्या चळवळीत भगवद्गीता कशा प्रकारे प्रेरणादायी ठरली आहे. त्याचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

(2) विनोबा भावे यांचा गीता विषयी अभिगम स्पष्ट करा.

**3. योग्य जोड्या जुळवा :**

| अ | ब |
|---|---|
| (1) खुदीराम बोझ | (1) बंगालचा वाघ |
| (2) सुभाषचंद्र बोझ | (2) सत्याचे प्रयोग |
| (3) गांधीजी | (3) पंजाब केसरी |
| (4) बाळगंगाधर टिळक | (4) बंगभंग चळवळ |
| (5) लाला लजपतराय | (5) आझाद हिंद फौज |
| (6) बिपिनचन्द्र पाल | (6) गीता-रहस्य |

## विद्यार्थी-प्रवृत्ती

(1) '1857 चा महासंग्राम' लेखक: पंडित सत्यनारायण शर्मा अनुवाद : रेखाबेन दवे – पुस्तक मिळवा व वाचा.

(2) उमाशंकर जोशी यांचे 'कर्ण-कृष्ण', 'युधिष्ठिर युद्धविषाद', कवि न्हानालाल यांचे 'भरतगोत्रचा लज्जाचीर' वगैरे साहित्य मिळवून वाचा.

(3) You Tube तसेच Google वरून श्रीमद् भगवद्गीता, क्रांतिकारक, चळवळी, स्वातंत्र्यसैनिक वगैरेंची माहिती शोधून वाचा.

(4) गीतेवर आधारित चिंतनात्मक सूत्रमाला तयार करणे, त्याचा सोशल मीडिया द्वारे प्रचार-प्रसार करा :

## शिक्षक-प्रवृत्ती

(1) क्रांती तीर्थ श्यामजी कृष्ण वर्मा-मांडवी (कच्छ) ची मुलाखत, प्रवासाचे आयोजन करणे तसेच माहिती देणे.

(2) गीतापाठ, व्याख्याने तसेच गीता आणि स्वातंत्र्यसैनिकां विषयी विविध प्रवृत्या शालेय स्तरावर विशेष उपक्रम करावे.

(3) ज्ञान, भक्ति कर्म यासारख्या सेवा कार्यक्रमांना भेट देणे. तसेच सहभागी होणे आणि विद्यार्थ्यांना सहभागी करणे.

(4) गीता जयंती उत्सवासारख्या स्पर्धा आयोजित करणे व पुस्तकांची समीक्षा सादर करणे.

# 20 परम सुखाची पायरी

एक गुरू आपल्या तीन शिष्यांसह जंगलात फिरायला जातो. तेथे सैद्धांतिक आणि प्रायोगिक अशा दोन्ही प्रकारे ज्ञान दृढ व्हावे या हेतूने ते निसर्गाच्या कुशीत हे ज्ञान देण्याच्या उद्देशाने ही इच्छा व्यक्त करतो. वैदिक साहित्याच्या काही भागांना 'आरण्यक ग्रंथ' असे म्हणतात. काही उपनिषदांमध्ये पण आरण्यक जुळलेले आहेत. उदाहरणार्थ 'बृहदारण्यकोपनिपद' या प्रकारचे उपनिषद आहे. अरण्यामध्ये सहजपणे अनुभवात्मक ज्ञान देणे ही भारतीय-वर्षानुवर्ष ही परंपरा आहे. याच परंपरेमुळे आपल्या देशाची जगात ऋषिसंस्कृती आणि कृषिसंस्कृती अशी वेगळी ओळख आहे. भारत आपल्या तत्वज्ञानासाठी खूप प्रसिद्ध आहे.

एका गुरुचे तीन शिष्य प्रशांत, प्रवृत्त आणि प्रमोह आहेत. ह्या संवादात सत्त्वगुण, रजोगुण, आणि तमोगुण यांच्यामुळे प्राणीमात्रांच्या जीवनावर व वागणुकीवर कसा परिणाम करतात ते गुरू स्वत:च्या शिष्यांना समजावतात.

**गुरू :** मुलांनो ! जर सर्वांची दिनचर्या पूर्ण झाली असेल तर सर्वजन स्वाध्याय प्रवचनासाठी तयार होऊन या. (शब्द कानावर पडताच प्रशांत नावाचा शिष्य धावत धावत येतो.)

**प्रशांत :** प्रणिपात, गुरुदेव !

**गुरू :** आशी: वर्धताम् (आशीर्वाद, खूप प्रगती करा.)

**प्रशांत :** गुरुदेव ! आपण तर रोज "स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्" - (तैत्तिरीयोपनिषद्-शिक्षावल्ली) (स्वाध्याय प्रवचनात आळस करू नये.) असे म्हणतात तरी सुद्धा प्रवृत्त तर शांतिप्रिय आणि प्रमोह तर अगदीच लहरी आहे कितीही बोलवले तरी काहीही परिणाम होत नाही अगदीच जाड कातड्याचा आहे. मला रोज त्याला पुन्हा बोलवायला जावे लागते. गुरुदेव ! "आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया" (रघुवंशम्-14.46) (गुरूंची आज्ञा उशिर केल्याशिवाय अमलात आणली पाहिजे.) ही गोष्ट तुम्ही रोज सांगतात पण म्हशी पुढे भागवत सारखे आहे. गुरुदेव ! मला कधी कधी असा विचार येतो की आमचे गुरू सारखे, गुरूकुल एकच, काम पण सारखे आणि वय पण सारखेच आहे. तरी सुद्धा आमच्या तिन्हींच्या आचरणात इतका फरक आहे. असे का ?

**गुरू :** तुझा प्रश्न छान आहे. त्याचे उत्तर भगवद् गीतेत खूप चांगल्या रीतीने दिले आहे.

**प्रशांत :** गुरुदेव, श्रीमद् भगवद् गीतेतून या प्रश्नाचे समाधान मिळेल ना ?

**गुरू :** हो बाळा ! या ग्रंथातून सर्वच प्रश्न सोडवता येतात.

**प्रशांत :** गुरुदेव ! सर्वच प्रश्न एकाच ग्रंथातून सोडवणे कसे शक्य आहे ? आंब्याच्या झाडापासून आंबे मिळतात. पण बोर, चिकू, सफरचंद सर्वच तर मिळत नाही ना ?

**गुरू :** पहा एका झाडाला एकच प्रकारचे फळ येते. पण एका पृथ्वीवर जितक्या प्रकारच्या बिया पेरल्या जातात, तितक्या प्रकारची फळे मिळू शकतात. अशा प्रकारे या ग्रंथमध्येही सर्व प्रकारच्या समस्यांचे समाधान मिळते.

**प्रशांत :** गुरुदेव, तुम्ही तर दृष्टांत सांगण्यात खूप हूशार आहात. कृपया जोपर्यंत प्रवृत्त आणि प्रमोह येत नाहीत तो पर्यंत माझ्या शंकेचे समाधान या ग्रंथामधून शोधून द्या ना ?

गुरू : तुम्ही तिन्ही शिष्य एकच ठिकाण, एकच गुरू, एकच वय आणि एकच अभ्यास कार्य करतात. तरीसुद्धा एक शांत एक चपळ, एक दीर्घदृष्टी असणारा किंवा प्रमादी आहे. त्याचे कारण आहे माणसात असलेले गुण. या गुणांची संख्या तीन आहे. सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुम. हे तीनही गुण माणसातच असतात असे नाही. प्राणीमात्रात पण असतात. जेणेकरून लैंगिक गुणधर्म समान आहेत. परंतु वैयक्तिक गुणधर्म भिन्न आहेत. त्यामुळे प्रत्येक जीव इतरांपेक्षा वेगळा आहे. उदाहरणार्थ हत्तीचा कळप पाहिला तर एक शांतपणे एकटा झाडाखाली उभा असतो, दुसरा अंगावर धूळ शिंपडतो व आंघोळ करतो. व हे सतत करत राहतो, धावतो, व खेळतो. तर तिसरा हत्ती झोपतो किंवा झाडाला दात मारतो. डोंगराला डोकं मारतो किंवा इतर हत्ती सोबत दात मारतो, डोंगराला डोकं मारतो किवा इतर हत्तीसोबत विनाकारण भांडण क़रतो असे आपण पाहिले आहे. असे होण्याचे कारण आहे त्रिगुणांचा प्रभाव – गीताजी मध्ये सांगितले आहे की –

**सत्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः ।**
**निबध्नन्ति महाबाहो देहे देहिमनमव्ययम् ॥ ( गीता 14.5 )**

( अर्थात् हे महाबाहो ! सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण हे प्रकृतीपासून उत्पन्न झालेले तीन गुण अविनाशी जीवात्म्याला शरीरात बांधून ठेवतात. )

**सत्वं सूखे संजयति रजः कर्मणि भारत ।**
**ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥ ( गीता 14.9 )**

( अर्थात् हे भारत ! सत्त्वगुण सुखात बद्ध करतो आणि रजोगुण कर्मामध्ये तसेच तमोगुण तर ज्ञानाला झाकून प्रमादात बद्ध करतो. ) येथे 'सुख' शब्दाचा अर्थ 'उदात्त सुख' असा होतो. हे तिन्ही गुण जीवमात्राला काही निश्चित वर्तन करण्यास प्रेरित करतात. सत्त्वगुण जास्त असेल तर तेजस्विता, शांती, सुख आणि ज्ञानात अभिरूची आणतो. जर रजोगुणाचे अधिपत्य असेल तर तो प्राणी प्रेमळ असंतुष्ट आणि सतत प्रवृत्तिशील किंवा चंचल असतो तर तमोगुणी प्राणी अज्ञानी, आळशी, झोपाळू आणि मोहयुक्त असतो.

ही, एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवली पाहिजे. जसे की वात, पित्त आणि कफ तिघांमध्ये जे अधिक असेल त्याचा आरोग्यावर परिणाम होतो. परंतु ज्याला वातचा प्रकोप असेल त्याला नेहमी श्वासोच्छवासाचा त्रास होईल असेही नाही. जो पित्ताने प्रभावित असेल त्याला नेहमी ॲसिडिटीचा त्रास होईल असेही नाही. व कफ प्रकृती असणारा नेहमी खोकलत राहिल असेही नाही. आहारविहाराच्या प्रवृत्तिने प्रभावित होईल तेव्हा जे जास्त असेल त्याचा परिणाम दिसतो. याचप्रमाणे तीन गुणांना समजले पाहिजे.

**प्रशांत :** गुरुदेव, वात, पित्त आणि कफमध्ये तर आपण जीवनशैलीमुळे परिवर्तन आणू शकतो. ह्या सत्त्व, रज आणि तम मध्ये जे गुण जास्त असतील तसेच वर्तन असेल ना ? त्यामुळे आपल्या वर्तनात साम्य तर शक्यच नाही ना ?

गुरू : हा प्रश्न खूपच महत्त्वाचा आहे. आपण गीतेमधून बोध घेऊन ते ज्ञान आचरणात आणले तर बदल शक्य आहे. ज्याप्रमाणे ब्लडप्रेशर (रक्तदाब) सारखे योग–आयुर्वेद वगैरेच्या ज्ञानाने आणि कृतीने नियंत्रित करता येतो. तसे गुणामध्येही ते शक्य आहे. नुसते जाणून घेतल्यास उत्तम औषध देखील रूग्णाला निरोगी बनवत नाही. त्याला शरीरात उतरवावे लागते तर त्याचा फायदा होतो. त्याचप्रमाणे हे ज्ञान पण उतरविले पाहिजे तरच फायदा मिळेल. अधीतिबोधाचरणप्रचारणैः नैषधीय चरितम्–1.4 असे शास्त्रात सांगितले आहे. अधीति : म्हणजे ज्ञान मिळविणे, नंतर बोध : म्हणजे समजून घेणे नंतर आचरणम् म्हणजे आचरणात आणणे आणि नंतर प्रचारणम् म्हणजे इतरांना उपदेश करणे. ही ज्ञानाची खरी पद्धत आहे.

जे लोक सत्त्वगुणी असतात ते समाजात आदर्श जीवन जगतात. त्याला सगळीकडे सन्मान मिळतो. कारण की 'ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था: असे गीतेत सांगितले आहे. 'मध्ये तिष्ठान्ति राजस:' जे रजोगुणी असतात ते मध्यम प्रकारचे जीवन जगतात. तो माणूस बनू शकतो पण सत्त्वगुण असणारा महामानव बनू शकतो. अधोगच्छति तामस: आणि तमोगुणी या अमूल्य जीवनाला व्यर्थ व उपेक्षित करतात. तमोगुणामूळे जीवन उपेक्षित होते. त्यात काम-क्रोध आणि लोभाचा अतिरेक अधिक कारणीभूत ठरतात. गीतेत म्हटले आहे की...

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मन: ।**

**काम: क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ ( गीता 16.21 )**

( अर्थात् काम, क्रोध व लोभ - ही तीन प्रकारच्या नरकांची द्वारे, आत्म्याचा नाश करणारी अर्थात् अधोगतीस घेऊन जाणारी आहेत. म्हणून या तिन्हींचा त्याग केला पाहिजे. )

अवगतम् ? आता कळले का ?

**प्रशांत :** हो गुरुदेव ! समजले. आभारी आहे ( इतक्यात प्रवृत्त आणि प्रमोह येतात. )

**प्रवृत्त :** प्रणाम गुरुदेव !

**गुरू :** वर्धताम् ( प्रगति होवो )

**प्रमोह :** नमो नम: गुरूदेव !

**गुरू :** तेजस्वी भव ( खूपच तेजस्वी व्हा. )

तुम्ही दोघे येण्यापूर्वी प्रशांतचा एक प्रश्न सोडवताना मी त्रिगुणाची समज दिली आहे. 'द्विर्बद्ध सुबद्ध भवति' अर्थात् एका गाठीला एक गाठ जोडली तर ती अधिक मजबूत होते. थोडक्यात सांगायचे तर आपले कार्य आपल्या गुणांची स्थिती ठरवते. आपले सर्व कार्य सात्त्विक असले पाहिजेत. चांगल्या जीवनासाठी ते अत्यावश्यक आहे. हे तुम्ही समजून घेतले पाहिजे. तुम्ही मला प्रणाम केला त्यात तर गुरुसाठी निष्ठा असेल आणि डोक्यासोबत मन पण नमेल आणि 'आचार्यदेवो भव' (तैत्तिरीयोपनिषद्-शिक्षावल्ली) हा चरितार्थ झाला तर तो प्रणाम सात्त्विक आहे. जर प्रणामाच्या वेळी,गुरुजी एक सामान्य आपल्यासारखाच माणूस आहे. पाया पडले तर त्यांना आवडेल. व चांगले शिकवतील, निकालावर कृपा करतील. असा विचार केला तर तो राजस प्रणाम आहे, व प्रणाम करतात म्हणून करायचा, नियम आहे म्हणून करायचा, प्रणाम करण्यास त्रास होत आहे असे वाटले. तर त्याला तामस प्रणाम म्हणतात.

मुलांनो, आपल्या काही प्रवृत्या जाणून आपण त्यात बदल आणू शकतो. मानवी जीवन हे परोपराकासाठी आहे. तेन त्यक्तेन भुञ्जीथा: (ईशावास्योपनिषद-1) अर्थात त्याग करून भोगणे, दान करणे, मदत करणे, ही मदत करण्याची पण विशिष्ट सात्त्विक पद्धत आहे.

**दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।**

**देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम ॥ ( गीता 17.20 )**

( अर्थात् 'दान देणे हे कर्तव्यच आहे' अशा भावनेने जे दान योग्य स्थळी, योग्य वेळी, योग्य व्यक्तिला उपकाराच्या अपेक्षेविना, जे दान दिले जाते त्याला 'सात्त्विक' दान म्हटले गेले आहे. )

गरजूंनी माझ्याकडे मागितल्यास मी देईल. भविष्यात मला त्याचा चांगला मोबदला मिळेल या विचाराने दिलेले दान म्हणजे राजस आहे आणि तुच्छतेने, तिरस्काराने व बळजबरीने, इच्छा नसतांना दिलेले दान म्हणजे तामस आहे.

या सर्व क्रियांचा परिणाम गुणावर होतो. दोघेही एकमेकांवर अवलंबून आहेत आता तुम्ही कोणतीही मदत देतात तेव्हा याचा विचार करा.

**प्रमोह :** गुरुदेव ! जसे दानाची क्रिया तीन प्रकारे होते. आणि त्या कृतीचा गुणावर परिणाम होतो. तसेच जेवणाच्या पद्धतीही वेगळ्या असू शकतात का ? आहाराचे पण असे प्रकार असू शकतात का ?

**गुरू :** तुझा प्रश्न योग्य आहे. तुमच्या वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांनी हे विशेषत: समजून घेतले पाहिजे. आधी तर आपण आहाराचा अर्थ जेवन असा करतो परंतु तो तेवढ्या पुर्ता मर्यादित नाही. परंतु आह्यियते गृह्यते इन्द्रियै: इति आहार: जे ज्ञानेन्द्रियाद्वारे ग्रहण करता येते ह्या सर्वांना आहारच म्हणतात. त्यामुळे काय ऐकांव, काय बोलावं, काय खावं-प्यावं, कशाचा वास घ्यावा, आणि कशाला स्पर्श करावा. या सगळ्यांचा विचार व्हायला हवा. कारण की ते सर्वच आहार आहेत. या सर्व गोष्टी जीवनावर प्रभाव टाकतात. व सगळ्यांचे तीन-तीन प्रकार आहेत. म्हणूनच असे म्हणटले आहे की...

**आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रिय: ॥ ( गीता 17.7 )**

**आयु: सत्त्वबलारोग्य सुखप्रीतिविवर्धना: ।**

**रस्या: स्निग्धा: स्थिरा हृद्या आहारा: सात्त्विक प्रिया: ॥ ( गीता 17.8 )**

( अर्थात् आयुष्य, बुद्धी, बल, आरोग्य सुख आणि प्रीति वाढविणारा रसयुक्त, स्निग्ध आणि स्थिर राहणारा तसेच स्वभावत: मनाला प्रिय असणारा असा आहार अर्थात् भोजन करण्याचे पदार्थ सात्त्विक पुरूषाला प्रिय असतात. )

**कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिन: ।**

**आहारा राजसस्येष्टादु:खशोकामयप्रदा: ॥ ( गीता 17.9 )**

( अर्थात् कडू, आंबट, खारट, अती उष्ण, तिखट, कोरडा, दाहकारक, दु:ख व रोग उत्पन्न करणारा आहार अर्थात् भोजन करण्याचे पदार्थ राजसी पुरूषाला प्रिय असतात. )

**यातयामं गतरसं पूर्ति पर्युषितं च यत् ।**

**उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥ ( गीता 17.10 )**

( अर्थात् जे भोजन अर्धवट शिजलेले रसरहित, दुर्गंधीयुक्त, शिळे, उष्टे तसेच जे अपवित्र सुद्धा असते ते भोजन तामसी पुरूषाला प्रिय असते. )

या सर्वांचा आहारातील गुणांवर परिणाम होतो. म्हणून ज्याला सात्त्विकता टिकवायची असेल, चांगले जीवन आणि उत्तम आरोग्य निर्माण करायचे असेल तर जे-ते, जिथे-तिथे, जेव्हा-तेव्हा, जसे-तसे कधिही खाऊ, पाहू, किंवा ऐकू नये. दिवसेंदिवस, लठ्ठपणा, मंदपणा वाढत जातो तितिक्षा (सर्तकता) व स्वच्छता कमी होत आहे. जंक फूड आणि कृत्रिम पेय पदार्थ तर अगदिच आहारात बंद केले पाहिजे.

मुलांनो, आता वैश्वदेवा (जेवनाची) ची वेळ झाली आहे. तर तुम्ही सात्त्विक भोजन करा नाममात्र वामकुक्षी करा आणि अभ्यासासाठी परत या तोपर्यंत मी माझे नित्यकर्म करून अल्पाहार पण करतो.

गुरुदेवांच्या सूचनेप्रमाणे विद्यार्थी जेवायला जातात आणि गुरूकुलाच्या नियमानुसार विद्यार्थी जेवण्यापूर्वी दोन श्लोक बोलून पार्थना करून प्रसाद ग्रहण करतात.

1. **ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।**

   **ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्म समाधिना ॥ ( गीता 4.24)**

2. **अहं वैश्वानरो भूत्वा प्राणीनां देहमाश्रितः ।**

**प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥ ( गीता 15.14)**

1. (ज्या यज्ञात अर्पण अर्थात् स्त्रुवादिकही ब्रह्म आहे व हवन करण्यायोग्य द्रव्य सुद्धा ब्रह्म आहे. तसेच ब्रह्मरूप कर्त्याद्वारे ब्रह्मरूपी अग्निमध्ये आहुती देण्याची क्रियासुद्धा ब्रह्म आहे. त्या ब्रह्मकर्मामध्ये समाधिस्त राहणाऱ्या योग्यांद्वारे प्राप्त करण्यायोग्य फळ सुद्धा ब्रह्मच आहे.)

2. (मीच सर्व प्राण्यांच्या शरीरात असणाऱ्या प्राण आणि अपान वायूद्वारे संयुक्त वैश्वानर - अग्नीरूप होऊन चार प्रकारचे अन्न पचवितो.)

(थोड्या वेळानंतर सर्वजन कुटिरमध्ये अभ्यासासाठी एकत्रित होतात.)

**शिष्ये** : गुरुदेव, प्रणिपात.

**गुरू** : कल्याणमस्तु । (कल्याण होवो.)

**प्रशांत** : गुरुदेव, तुम्ही या वयात पण तप व साधना करीतच आहेत ? तुम्ही तर किती मोठे तपस्वी आहात ?

**गुरू** : भगवद्‌गीता म्हणते की प्रत्येकजण तपस्वी होऊ शकतो.

**शिष्ये** : गुरुदेव, असे असेल तर आम्हाला पण सांगा ना, आम्हाला पण तपस्वी व्हायचे आहे.

**गुरू** : मुलांनो ! साधे जीवन जगणे, अहिंसेचे पालन करणे हे सगळे शारिरीक तप आहे. सत्य बोलणे, प्रिय बोलणे विवेकापूर्ण बोलणे, याला वाणीची तपस्या म्हणतात मनाने प्रसन्न राहणे, शांत आणि सौम्य असणे, संयमी असणे ही मानसिक तपश्चर्या आहे. अशाप्रकारे आपण सात्त्विक जीवनशैली स्वीकारली तर आपले जीवन एक उत्तम तप आहे

**प्रमोह** : गुरुदेव, हे तप केल्याने काय फळ मिळते ?

**गुरुदेव** : बघ बाळा, फळाच्या अपेक्षेने केलेले तप राजस होते. हे सर्व माझ्या सांगण्यामुळे बळजबरीने कराल तर ते तामस तप होईल. परंतु निरपेक्ष भावनेने कराल तर ते सात्त्विक तप होईल. तुम्हाला एक उत्तम मनुष्य बनवेल. तुमचे जीवन भव्य आणि दिव्य होईल.

**शिष्ये** : करिष्ये वचनम् ! आम्ही आपण सांगितल्या प्रमाणे जीवनशैलीचे अनुसरण करू. सात्त्विक कार्यातून खरे शिष्य बनू.

**गुरुदेव** : "गुरूं प्रकाशयेत् स शिष्यः" जो गुरुचा महिमा पसरवतो आणि त्यांची ओळख बनतो तोच खरा शिष्य. तुम्ही तसे बना. चला सर्वजन बोलू या.

**सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः ।**

**पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ( गीतामाहात्म्य-6 )**

(अर्थात् सर्वच उपनिषद गायी आहेत. परमात्मा श्रीकृष्ण हे दोहनकर्ता आहेत. अर्जुन वत्स (वासरू) आहे. विद्वान ते भोगणारे आहे. आणि गीतारूपी अमृत हे दूध आहे.)

(अस्तु शम् ! सर्वांचे कल्याण होवो.)

## शब्दार्थ

**दृष्टांत** – उदाहरण, **त्रिविध** तीन प्रकार असणारे, **वैश्वानर** वैश्वानर नावाचा अग्नि, **विवेकसभर** विवेकपूर्ण, **द्विबद्ध** – दोनवेळा बांधलेले, **सुबद्ध** – चांगल्या रीतीने बांधलेले.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) गुण किती आहेत ? आणि कोणत्या गुणांचा काय–काय परिणाम असतो ?

(2) तीन गुणांची सामान्य वैशिष्ट्ये कोणती ?

(3) काम, क्रोध आणि लोभ का सोडून द्यावे ?

(4) कोणती तपस्या सात्त्विक तपस्या आहे ?

(5) तामसिक आहार कशाला म्हणतात ?

**2. खालील प्रश्नांची उत्तरे द्या :**

(1) प्रशांत, प्रवृत्त आणि प्रमोह यांच्या मध्ये कोणता गुण प्रदान आहे ? असे तुम्हाला का वाटते ?

(2) अधितीबोधाचरणप्रचारणै: । समजवा.

(3) दानाचे तीन प्रकार तुम्हाला आलेल्या अनुभवांच्या उदाहरणाद्वारे समजवा.

(4) कोष्टक पूर्ण करा.

| आहाराचे प्रकार | गीतेच्या कोणत्या श्लोकात उल्लेख आहे ? | समज | उदाहरण |
|---|---|---|---|
| सात्त्विक | 17.8 | | |
| राजसी | | | |
| तामसी | | | |

## विद्यार्थी–प्रवृत्ती

(1) अनुष्टुप छंदाचे गायन करावे.

(2) आहाराविषयी मिळालेल्या माहितीची रोजच्या आहारात अंमलबजावणी करणे.

(3) जेवण सुरू करण्यापूर्वी – बोलण्याचे श्लोक कंठस्थ करणे.

## शिक्षकाची भूमिका

(1) विद्यार्थ्यांना सात्त्विक आहाराचे फायदे वारंवार समजावून सांगणे जेणेकरून विद्यार्थ्यांना ते जीवनात अंमलात आणता येईल.

(2) श्लोकांचे शुद्ध उच्चार आणि लयबद्ध गायन शिकविणे.

(3) अध्याय 17 आणि 18 मध्ये सात्त्विक,, राजसी आणि तामसी असे प्रत्येकी तीन प्रकार कोणत्या गोष्टींसाठी स्पष्ट केले आहेत ?

# 21 त्रिवेणी

संध्याकाळची वेळ आहे. सूर्यास्त होत आहे. किलबिलाट करणारे पक्षीही घरट्याकडे परतत आहेत. त्याचवेळी कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून कार्यरत असलेले भार्गवभाई घरी परतत आहे. भार्गवभाईचा मुलगा धौम्य आणि मुलगी धीमहि शाळेत शिकतात. दोन्ही मुले गृहपाठ करीत आहे. भार्गवभाई सहजपणे धौम्यचे 'गुजराती' विषयाचे पुस्तक हातात घेतात. त्याचे पान उघडताच त्यांचे लक्ष नरसिंह महेताच्या या पदावर पडते. "अखिल ब्रह्मांडमां एक तुं श्रीहरि."

भार्गवभाईचे हे पद आवडते असल्यामुळे ते भावपूर्ण अंत:करणाने गाऊ लागतात. वडिलांना गातांना पाहून दोन्ही मुलं वडिलांजवळ येऊन बसले. दोन ओळी गायल्यानंतर भार्गवभाई म्हणाले, "अरे ! धौम्य, तुमचा अभ्यासक्रम इतका छान आहे की आपले भक्त कवी नरसिंह महेता यांचे इतके सुंदर पद !"

(आता, वडील,, मुलगा, आणि मुलगी यांच्यामध्ये नरसिंह महेताच्या पदांवरून संवाद सुरू झाला.)

**धौम्य** : "बाबा, मी ऐकले आहे की नरसिंह महेता भगवताचा खूप मोठा भक्त होता ?"

**भार्गवभाई** : "हो बाळा, नरसिंह महेता यांनी तर त्यांच्या एका पदात भक्तिला महत्त्व देतांना असे सुद्धा सांगून टाकले की, 'भूतळ भक्ति पदारथ मोटुं, ब्रह्मलोकमां नाही रे.'

**धीमहि** : "बाबा, भक्ति म्हणजे काय ?"

**भार्गवभाई** : "बाळा, भक्ति म्हणजे ईश्वरासोबत आत्मिक संबंध. भक्ति म्हणजे फक्त बाह्याचार च न राहता स्वत:चे कर्मकौशल्य भगवंतापर्यंत पोहचविणे. आपल्या कर्मकौशल्यांना ईश्वरगम्य बनविण्यासाठी भक्तिचे नऊ मार्ग सांगितले आहेत."

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।**

**अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ ( श्रीमदभागवतमहापुराणे - 7.5.23)**

(अर्थात् श्रवण, कीर्तन, स्मरण, सेवा, अर्चन, वंदन. आणि भगवंताला स्वामी मानून दासभाव ठेवणे, भगवंता सोबत मैत्रीभाव ठेवणे आणि भगवंतालाच सर्वस्व मानून आत्मनिवेदन करणे.)

**धौम्य** : "बाबा, भगवंताची भक्ति करण्यासाठी सर्वांत महत्त्वाचे साधन काय आहे ?"

**भार्गवभाई** : "भगवंताच्या भक्तिसाठी श्रद्धाच सर्वात महत्त्वाची आहे. असे तर भगवद् गीतेत सांगितले आहे की श्रद्धे शिवाय करण्यात आलेले तप, दान. किंवा कर्म व्यर्थ आहे. आपण जे काही करतो त्यात श्रद्धा जरूरी आहे. परंतु भगवंताच्या भक्तिसाठी तर ती खूपच अनिवार्य आहे. भगवद् गीतेच्या बाराव्या अध्यायात अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर देतांना भगवंतांनी भक्ति मार्गात श्रद्धेचे महत्त्व सांगतांना म्हटले आहे-की :

**मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।**

**श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ ( गीता - 12.2)**

(अर्थात् माझ्यामध्ये मनाला एकाग्र करून निरंतर माझ्या ध्यान - भजनात मग्न असलेले जे भक्तजन अतिशय श्रेष्ठ श्रद्धेने युक्त होऊन मज, सगुणरूपी परमेश्वराला भजतात ते मला योग्यांमध्येही अती उत्तम योगी वाटतात.)

**धीमहि** : बाबा, भगवद् गीतेच्या आधारे आपण कसे जीवन जगलो तर भगवंताला आवडेल ?

**भार्गवभाई :** "बाळा, आदर्श जीवन जगण्यासाठी" तू खूप छान प्रश्न केला आहे. आई-वडिल, वडिलधाऱ्यांची सेवा करणे, शिक्षकांचा सन्मान करणे, सत्य बोलणे, भगवंतावर श्रद्धा ठेवणे, आजूबाजूच्या लोकांना मदत करणे, नियमित अभ्यास करणे, लवकर झोपावे, लवकर उठावे, साधे जीवन आणि सात्त्विक भोजन घेणे, ईर्षा किंवा हेवादावा न करणे, मन स्वच्छ ठेवणे, सफाई आणि स्वच्छतेला महत्त्व देणे. तसेच पर्यावरणाचे रक्षण करणे. या प्रकारचे जीवन जगलो तर आपण भगवंताला प्रिय होऊ"

**अमानित्वदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।**
**आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रह: ॥ ( गीता 13.8)**

**धौम्य :** "बाबा, ज्ञान आणि भक्तिचा काय संबंध आहे ?"

**भार्गवभाई :** बाळा, ज्ञान आणि भक्ति दोन्ही एकमेकांना पूरक आहेत. जेंव्हा एखादा ज्ञानी संपूर्ण जगाचा आणि स्वत:चा आधार म्हणून भगवंताला पाहतो मग तो भगवंतापासून वेगळा कसा होऊ शकेल ? तो ज्ञानानेच भगवंता सोबत एकरूप होतो. आपल्याकडे असे अनेक ज्ञानवंत होऊन गेले. ज्यांनी स्वत:च्या ज्ञानाला भगवंताशी जोडून भक्तियोग साधला. जसे की आदिशंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य, चैतन्य महापप्रभु, रमण महर्षि, श्री अरविंद, श्रीमद् रामचंद्र वगैरे. हे सर्व लोक अतिशय विद्वान आणि शास्त्रवेत्ता असून भक्ति व ज्ञानाने एकरूप होते. ज्ञानी भक्तांसाठी भगवद्गीता म्हणते :

**तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।**
**प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रिय: ॥ ( गीता 17.7)**

(त्यांच्यापैकी नित्य माझ्यात एकीभावाने स्थित, अनन्य प्रेमभक्ति असणारा ज्ञानी भक्त अती उत्तम आहे, कारण की मला तत्त्वाने जाणणाऱ्या ज्ञानीला मी अत्यंत प्रिय आहे आणि तो ज्ञानी मला अत्यंत प्रिय आहे.)

**धीमहि :** "बाबा, ज्ञान कोणाला म्हणतात ?"

**भार्गवभाई :** हे संपूर्ण विश्व वेगवेगळ्या प्रकारच्या 24 तत्त्वांनी बनलेले आहे. या तत्त्वाच्या समूहाला भगवद् गीतेत 'क्षेत्र' म्हणून ओळखले जाते. आणि जो त्याला ओळखतो त्याला क्षेत्री असे म्हणतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर क्षेत्र म्हणजे आपले पिंड अर्थात शरीर. आपल्याकडे म्हणतात "पिंडी ते ब्रह्मांडी" अर्थात जे पिंडरूप शरीरात आहे तेच संपूर्ण ब्रह्मांडात आहे. या शरिराला जाणनारा आपला अंतरात्मा आहे. तोच भगवंताचा अंश आहे. त्यालाच क्षेत्री असे म्हणतात या क्षेत्र आणि क्षेत्रीच्या ज्ञानालाच ज्ञान असे म्हणतात.

**क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।**
**क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ ( गीता 13.2)**

**धीमहि :** "बाबा, भगवंत सर्वत्र विराजमान आहे तर तो सागळ्यांना भगवंत स्वत: मध्ये उपस्थित आहे असे वाटते का ?"

**भार्गवभाई :** "नाही बाळा, भक्ती जितकी प्रबळ असेल तितकाच भगवंत आपल्याला आपल्यात आहे असे जाणवते. जसे सूर्याच्या किरणांत अग्नि असतो. परंतु तो अग्नि प्रत्यक्ष आगी सारखा दिसत नाही. जेंव्हा कोणी बिलोरी काच घेऊन त्या अग्निकिरणांना गोळा करेल तेव्हा बिलोरी काचेच्या समोर ठेवलेला कागद जळू लागतो. अशाप्रकारे जेव्हा एखादा मनुष्य आपली भक्ती दृढ करतो. तेव्हा त्याच्या प्रबळ भक्तिमुळे भगवंत ज्याप्रमाणे प्रत्यक्ष जाणवतो त्याचप्रमाणे बिलोरी काचेमधून सूर्याचा अग्नि."

धौम्य : "बाबा, भगवद्गीतेत कर्मयोगाची पण गोष्ट आली आहे. तर कर्माचा भक्तिशी काही संबंध आहे का ?"

भार्गवभाई : "हो बाळा ! भगवद् गीतेच्या मतानुसार कोणताही व्यक्ति क्षणभर पण कर्म शिवाय राहू शकत नाही."

**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् । (गीता 3.5)**

कर्माशीवाय तर जीवनाचा प्रवासही थांबेल. परंतु आपल्याला आवश्यक करावे लागतील तसे कर्म जर आपल्या लौकिक इच्छाऐवजी भगवंताला शरण गेलो तर अशा कर्मांमधूनही आपल्याला भक्तियोग प्राप्त होऊ शकतो. आपल्याकडे रामकृष्ण परमहंस, कबीरजी, संत तुकाराम, रोहीदास, जलाराम बापा, भक्त नरसिंह महेता वगैरे सारखे अनेक संत व भक्तांनी स्वत:च्या कर्माला भगवंताशी जोडून भक्तियोग प्राप्त केला होता. ते ह्या संसारातच राहून, स्वत:चे लौकिक कामे करत असतानाच भगवद् दर्जा मिळविला. म्हणून भगवद् गीतेत सांगितले आहे.

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।**

**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥ (गीता 18.46)**

(अर्थात् ज्या परमेश्वरापासून सर्व प्राण्यांची उत्पत्ती झाली आहे आणि ज्याने हे समस्त जगत व्यापले आहे, त्या परमेश्वराशी आपल्या स्वाभाविक कर्माद्वारे पूजा करून मनुष्य परम सिद्धी प्राप्त करतो.)

धौम्य : "बाबा, भगवंताला कसा भक्त आवडतो ?"

भार्गवभाई : तू खूपच चांगला प्रश्न विचारला आहेस. कवी नरसिंह महेतांचे "वैष्णवजन" भक्तिपदाविषयी तुम्हाला माहितच असेल ना ! त्या अनुषंगाने भगवद् गीता असेही म्हणते कीं, ज्या प्राणीमात्रात द्वेष भावना वगैरे नसते, जो सर्वांशी मैत्री आणि दयाभाव ठेवत असेल, जो सदैव समाधानी असेल, ज्याने भगवंतावर दृढ विश्वास ठेऊन स्वत:चे मन व बुद्धी भगवंताला सर्मर्पित केली असेल तसा भक्त भगवंताला अत्यंत प्रिय असतो. जो कोणत्याही जीवाला उद्वेग देत नाही. तसेच स्वतः पण कोणाकडूनही उद्विग्न होत नाही. तसेच दुसऱ्याची उन्नति पाहून ईर्ष्या करीत नाही आणि भयमुक्त असतो तसा भक्त भगवंताला प्रिय आहे. याशिवाय पण जो मान-अपमान, सुख-दु:ख, निंदा-स्तुती यात समान भाव ठेवणारा असतो. म्हणजेच की जो सन्मानाने मदमस्त होत नाही, अपमानाने दु:खी होत नाही, जो स्वत:च्या निंदेने विचलित होत नाही, स्तुती केल्याने फुलत नाही. तसा स्थिर बुद्धी असलेला भक्त भगवंताला प्रिय आहे. म्हणूनच तर,

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।**

**निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ (गीता 12.13)**

(अर्थात् जो पुरूष सर्व प्राणिमात्रांमध्ये द्वेषभावरहित, स्वार्थरहित, सर्वांचा प्रेमी. आणि कारणरहित दयाळू आहे. तसेच ममतारहित, अहंकाररहित, सुख-दु:खाच्या प्राप्तीत सम आणि क्षमाशील आहे.)

**यस्मान्नोद्विजते लोको लोकोन्नोद्विजते च यः ।**

**हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ (गीता 12.15)**

(अर्थात् ज्याच्यामुळे कोणत्याही प्राण्याला उद्वेग होत नाही आणि ज्याला स्वतः सुद्धा कोणत्याही प्राण्यामुळे उद्वेग होत नाही तसेच जो हर्ष, अमर्ष (क्रोध), भीती आणि उद्वेगादिकांनी रहित आहे. तो भक्त मला प्रिय आहे.)

**धौम्य** : बाबा, आज तुम्ही भक्तीसोबत भगवद् गीतेला जोडून खूपच छान बोललात.

**धीमहि** : हो बाबा, मला पण खूप मजा आली.

**धौम्य** : बाबा, भगवद्गीता ऐकून असे वाटते की आपण हा ग्रंथ आवश्यक वाचला पाहिजे. कारण यामध्ये आपले जीवन उन्नत (सुधारण्यासाठी) करण्यासाठी गोष्टी सांगितल्या आहेत.

**भार्गवभाई** : हो मुलांनो, श्रीमद् भगवद्गीता हा नियमित पाठ-पठन करावयाचा ग्रंथ आहे.

●

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) धौम्यच्या गुजराती विषयच्या पाठ्यपुस्तकात भार्गवभाईने काय पाहिले ?

(2) भक्तिचे कोणतेही पाच प्रकार सांगा.

(3) भगवंताला प्रिय असणारे भक्ताचे पाच गुण सांगा.

(4) विश्वव्यापी भगवंताला स्वत: चे कर्म कशा रीतीने समर्पित करता येईल ?

**2. खाली दिलेल्या ( अ ) विभागाच्या वाक्यासोबत ( ब ) विभागाच्या वाक्यांची योग्य जोडी जुळवा :**

| ( अ ) विभाग | ( ब ) विभाग |
|---|---|
| (1) भक्ति म्हणजे | (1) कणाकणात भगवंताला पाहतो. |
| (2) कर्मयोग म्हणजे | (2) भगवंता बरोबर आत्मिक संबंध |
| (3) ज्ञानी भक्त | (3) कर्माला भगवंताशी जोडणे |

## विद्यार्थी-प्रवृत्ती

(1) श्लोकांचे शुद्ध उच्चारण करणे तसेच सूरात गाण्याचा प्रयत्न करा.

(2) पाठ समजून त्यावर निबंध आणि वक्तृत्व तयार करा.

(3) श्लोकाचा अनुवाद भगवद् गीतेच्या पुस्तकात पहा. पाठा संदर्भात प्रश्न तयार करून तुमच्या शिक्षकांजवळून मार्गदर्शन घ्या.

## शिक्षकाची भूमिका

(1) श्लोकांना राग आणि लयात विद्यार्थ्यांना समूहात गाण्यास शिकवावे.

(2) तुमच्या वर्गखंडात चांगल्या लयीत गाऊ शकेल अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वर्गखंडात गायला सांगा व त्यांना प्रोत्साहित करा.

(3) वर्गखंडात श्लोकांचे गायन तसेच श्लोकपूर्तीची चाचणी घ्या.

(4) आदि शंकराचार्यजी स्वामी चैतन्य महाप्रभू, रमण महर्षि, श्री अरविंद, राजा जनक, स्वामी रामतीर्थ, रामकृष्ण परमहंस, संत कबीर, संत तुकाराम, संत रोहिदास, संत जलाराम बापा, संत नरसिंह महेता यांसारख्या ज्ञानी आणि भक्त पुरूषांच्या जीवन चरित्राविषयी थोडक्यात सांगा.

(5) स्वामी विवेकानंदांचा कर्मयोग, विनोबा भावेंचे गीता प्रवचनांचा अभ्यास करून थोडक्यात सांगा.

(6) भक्तियोग साठी सखोल अभ्यास करणाऱ्या शिक्षकांनी श्रीमद् भगवद्गीतेच्या बाराव्या अध्यायाचे वाचन करावे.

(7) भक्त कविंचे सिद्ध पद किंवा ज्यांचे ओडियो-विडियो उपलब्ध असतील त्यांचा उपयोग करुन वर्गात प्रस्तुत करा.

# 23 वैश्विक ग्रंथ-श्रीमद् भगवद्गीता

श्रीमद् भगवद्गीता मनुष्य आणि सृष्टिकर्ता यांच्यातील सत्य-बोधाचा दिव्य संवाद आहे, ज्यामध्ये अर्जुन केवळ मानवाचे प्रतिनिधित्व करतो. भगवद्गीते द्वारे, श्रीकृष्ण भगवंताच्या रूपात दिव्य मार्गदर्शन प्रदान करतात. कुरूक्षेत्राच्या मैदानात युद्धाच्या वेळी उद्घोषित केलेला हा दिव्य संवाद समस्त मानवजातिच्या कल्याणाच्या मार्गाचा बोधक (आश्रयदाता) आहे. गीतेमध्ये दिलेले ज्ञान हे कोणत्याही विशिष्ट मानवी समुदायासाठी, कोणत्याही विशिष्ट काळासाठी किंवा विशिष्ट क्षेत्रासाठी नाही. गीतेची शिकवण कालातीत आणि वैश्विक आहे. संपूर्ण मानवी समुदायाला ध्येयाभिमुख, उन्नत, निर्भय, शांत, सर्जनशील, पवित्र आणि समाधानमय बनविण्यासाठी गीता पारसमणी आहे. या अर्थाने गीता वैश्विक ग्रंथ आहे. दुसऱ्या रितीने पाहिले तर जगातील अनेक महापुरूषांनी गीतेचे वैश्विक महत्त्व त्यांच्या शब्दात वर्णन केले आहे. त्या दृष्टीनेही गीता हा एक वैश्विकग्रंथ आहे.

अमेरिकन विद्वान हेनरी डेविड थोरो म्हणतात, "गीते सोबत तुलना केली असता आधुनिक जगाचे ज्ञान आणि साहित्य मला तुच्छ वाटते. मी दररोज पहाटे स्वत:चे हृदय आणि बुद्धिला गीतारूपी पवित्र पाण्याने स्नान घालतो." तर इंग्लन्डचे प्रसिद्ध तत्त्वज्ञ अलदु हकसली म्हणतात की, "गीता ही आतापर्यंत प्रकाशित झालेल्या शाश्वत तत्त्वज्ञानाचा सर्वात स्पष्ट आणि संपूर्ण सारांश आहे. हा केवळ भारताचाच नव्हे तर संपूर्ण मानवजातीचा शाश्वत, अमूल्य धरोहर आहे" जर्मन विद्वान डब्ल्यू वान हंबोल्ड गीताचा गौरव सांगतांना म्हणतात की "भगवद्गीता ही जगातील सर्वात सुंदर तसेच महान ज्ञानाची तात्त्विक कृती आहे." जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आल्बर्ट आइन्स्टाईन म्हणतात की, "जेव्हा मी भगवद्गीता वाचतो आणि विचार करतो की देवाने हे ब्रह्मांड कसे निर्माण केले तेव्हा सर्वच अनावश्यक वाटते. महात्मा गांधीजी पण म्हणतात की, "मी माझ्या सर्व अडचणीच्या क्षणी गीता माताकडे धाव घेतो. आणि आजवर मला आश्वासन (सांत्वन) मिळाले आहे." आपले भूतपूर्व राष्ट्रपति अब्दुल कलामजी म्हणतात की, "गीता ही मानवजातीसाठी चिरंतन प्रेरणास्त्रोत आहे. गीतेचा अभ्यास केल्याने माझ्या समस्या सुटतात."

अशाप्रकारे विश्वमांगल्य भावनेने ओतप्रोत भरलेल्या भारतीय संस्कृतिचे अमूल्य वरदान म्हणजे श्रीमद् भगवद्गीता ! या सद्ग्रंथाची विलक्षणता ही आहे की तो खूप थोडक्यात खूप काही सांगून जातो.ही गुणमयी गीता जीवनाच्या बुद्धीरुपी घागरमध्ये आनंद, शांती आणि प्रेमाचा अथांग सागर भरून देते. अत्यंत दुर्मिळ आणि प्रगल्भ अशा वेदान्त ज्ञानाला या ग्रंथाने सर्वसामान्यांना सोप्या आणि लोकप्रिय भाषेत उपलब्ध करून दिले आहे. तो आहे. -"वासुदेवः सर्वम् इति ॥" (गीता 7.19)

वासं करोति इति वासुदेवः । अर्थात् जो सर्वांमध्ये वास करतो तो वासुदेव ! जरी जगातील प्रत्येक गोष्ट भिन्न असली तरी ती मूलत: एकच चैतन्य शक्ति आहे. अर्थात परमात्माच आहे. आणि परमात्मा एक असूनसुद्धा तो अनेक रूपांनी दिसतो. ज्याप्रमाणे फुग्यांचा आकार व रंग वेगवेगळा असला तरी त्यात हवा मात्र एकच आहे. त्याप्रमाणे सर्वांमध्ये एकच परमात्मा तत्त्व वेगळे वाढत असते.

हा भाव आत्मसात केल्याने आपले जीवन आणि आचरण परोपकारी मंगलमय बनते. तसेच आपण उद्यमी, उपयोगी आणि सहकार्यशील होऊन सर्वांचे प्रिय बनतो. अशाप्रकारे माणूस स्वत: मध्येच तृप्त होऊन जीवनसाफल्य प्राप्त करतो. गीतेत "भगवंत" शब्द वारंवार येतो. तर "भगवंत" शब्दाचा अर्थ काय आहे ?

**ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ।**

**वैरागस्य च मोक्षस्य षण्णां भग इतीरितः ॥ ( विष्णुपुराणम् 6.5.74 )**

(अर्थात् जो ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, मोक्ष आणि वैराग्य यांनी संपन्न आहे. त्यालाच भगवंत असे म्हणतात.) याच गोष्टीला भगवद् गीतेत तात्त्विक रितीने समजवताना सांगितले आहे की यो मां पश्यति सर्वत्र सर्व च मयि पश्यति । (गीता 6.30) अर्थात् जो पुरूष सर्वांच्या ठायी आत्मरूपी मज वासुदेवालाच व्यापकतेने पाहतो आणि सर्वांना मज वासुदेवामध्ये पाहतो त्याचा नाश होत नाही. विभिन्न जाती, मत, पंथ, संप्रदाय त्याला आपआपल्या नावाने संबोधतात व पूजा आराधना करतात परंतु ते एकच चैतन्य आहे.

भगवद्गीता ग्रंथ हा, कोणताही धर्म, जात, मत, पंथ, संप्रदाया पूर्ता मर्यादित नाही पण तो सर्व सजीवांसाठी आहे. गीताउपदेश घेण्यासाठी कोणत्याही विशेष अधिकाराची गरज नाही. ही भगवंतांनी स्वतःच्या मुखाने सांगितली आहे.

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**

**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ( गीता 9.30 )**

(अर्थात् जरी कोणी अतिशय दुराचारी सुद्धा अनन्यभावाने माझा भक्त होऊन माझी सेवा करीत असेल तर तो साधूच मानण्यायोग्य आहे. कारण तो यथार्थ निश्चयी पुरूष आहे, अर्थात त्याने पूर्णपणे निश्चय केला आहे की परमेश्वराच्या भजनासमान अन्य काहीही नाही तसेच श्रीकृष्ण पुढे पण असे म्हणतात की –

**क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति । ( गीता 9.31 )**

(अर्थात् तो मनुष्य त्वरित धर्मात्मा होतो आणि सदैव राहणाऱ्या परमशक्तिला प्राप्त करतो.)

गीता हा सर्व जीवांच्या सर्व समस्यांवर उपाय आणि सांत्वना देणारा ग्रंथ आहे. आबालवृद्ध, साक्षर–निरक्षर सर्वांना गीता आनंदी जीवनाचा मार्ग शोधण्यासाठी प्रेरणा देते.

त्याने स्वतःमध्ये आणि इतरांमध्ये समान परमात्म तत्त्व व्यापले आहे. हे सत्य लक्षात ठेऊन एकमेकाशी सद्भाव ठेऊन सक्रिय प्रगती करण्यासाठी गीता सांगते की –

**परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ( गीता 3.11 )**

(अर्थात् निःस्वार्थभावाने एकमेकांना उन्नत करून तुमचे परम कल्याण होईल.)

प्राचीनकाळापासून या जगात दैवी आणि आसूरी (राक्षस) संपत्ती यांच्यातील संघर्ष सुरू आहे. जगातील प्रत्येक मनुष्य हा दैवी आणि आसुरी गुणांचे मिश्रण आहे. गीतेत श्रीकृष्णाने दैवी आणि आसुरी गुणांचे वर्णन केले आहे. आसुरी घटकापासून मुक्त होणे आणि दैवी तत्त्वांचा आपल्यात विकास करणे हे मानवी जीवनाला उन्नत करण्याचे साधन आहे.

ते मिळविण्यासाठी मानव सतत धडपडत असतो. मानवाला हताशा, निराशा, क्रोध, मत्सर, इत्यादी आसुरी गुणांचा त्याग करण्यास गीता सांगते. गीता प्रत्येक मानवाला देवी संपत्तीचा मालक मानते. श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात की ना शुचः संपदम् दैवीम् अभिजातोऽसि पाण्डव। (16.5) अर्थात् हे "अर्जुन ! तू शोक करू नकोस, तू दैवी गुण घेऊन जन्माला आला आहेस." अर्जुन हा गीतेतील मनुष्यमात्राचा प्रतिनिधी असल्यामुळे हा विचार संपूर्ण मानवजातीसाठी आहे. हा विचार अर्जुनाच्या माध्यमाने संपूर्ण जगाच्या मानवाला स्पर्श करतो. कारण की प्रत्येक मानवाने दैवी संपत्तीचे गुण विकसित केले पाहिजेत. गीतेचे सारतत्त्वच मा शुचः आहे. गीतेत श्रीकृष्णाचा उपदेश अशोच्यानन्वशोचस्त्वम् (गीता 2.11) पासून सुरू होऊन मा शुचः (गीता 18.66) वरच पूर्ण

होतो. अशाप्रकारे संपूर्ण गीतेचा सार हाच आहे की कोणत्याही परिस्थितीत दु:खी होऊ नये, शोक करू नये. याच संदर्भात श्रीकृष्ण म्हणतात की तत्र का परिदेवना (गीता 2.88) अर्थात् त्यात विलाप (दु:ख) कशासाठी करावे ?

गीता हा प्रत्येक मानवाच्या सर्वांगीण विकासाठी सुलभ ग्रंथ आहे. कारण की तो समन्वयवादी विचार धारेला प्रस्तुत करतो. गीतेचा आदर्शच हा आहे की, मानवाचा सर्वांगीण आणि संतुलित विकास झाला पाहिजे. विचार, क्रिया आणि प्रेम भावना हे मानव स्वभावाचे अंश आहे. यापैकी एकही कमतरता मानवी व्यक्तित्वच्या आणि विकासाची त्रूटी समजली जाते. मानवी स्वभावात या तिघांपैकी कोणत्याही एकाची अधिकता पण होऊ शकते, असे गीता सांगते. त्यामुळेच ज्ञान, कर्म आणि भक्ति ह्या तिघांपैकी कोणत्याही एकाची अधिकता असणाऱ्या आचरणाला अनुक्रमे ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग अशी नावे दिली आहेत. 'तिन्ही एकमेकांचे पूरक आहेत. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी तिघांचा समन्वय आवश्यक आहे.'

जगातील कोणत्याही माणसाचे व्यक्तिमत्त्व दैवी गुणांनी युक्त बनविण्यासाठी गीता सर्वांगीण विकास करण्यासाठी मदतरूप होऊ शकते. म्हणूनच श्री अरविंद घोष यांच्या मतानुसार गीता 'समन्वयाचा ग्रंथ' आहे. त्याचा समन्वयाचा हेतू मानवतेच्या उत्थानाचा आहे.

गीता सर्वांना मार्गदर्शन करते की भूतकाळाच्या दु:खाचा शोक करू नये, भविष्याची व्यर्थ चिंता करू नये, वर्तमानाचे मूल्य समजून कर्तव्य केले पाहिजे. सहजं कर्म कौन्तेयं सदोषमपि न त्यजेत् ! (गीता 18.48) अर्थात् दोषयुक्त असले तरीपण स्वाभाविक कर्माचा त्याग करू नये. कारण की स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः (गीता 18.46) अर्थात् त्या परमेश्वराची आपल्या स्वाभाविक कर्माद्वारे पूजा करून परम सिद्धी प्रात करतो. लोकमानन्य टिळक म्हणूनच गीतेला 'कर्तव्य – अकर्तव्यचा विचार करणारे नीतिशास्त्र' म्हणतात.

गीतेचे वाचन करणारा विद्यार्थी किंवा मनुष्यामध्ये निर्भयता, सात्त्विकता, संयम, सदाचार, परोपकार, अंत:करणाची पूर्ण निर्मळता आणि विविधतेत एकता वृत्ती सारख्या सद्गुणांची वृद्धी होते.

गीताकार निष्पक्ष आहे. तो निराग्रही आहे आणि मानवाला पण किती स्वतंत्र बनवू इच्छितो ते गीतेच्या शेवटच्या अध्यायाच्या समापन वेळी दिसून येते. गीता उपदेश केल्यावर श्रीकृष्ण शेवटी अर्जुनाला असे सांगतात की –

**इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।**

**विमृश्यैतदशेषेम यथेच्छसि तथा कुरु ॥ (गीता 18.63)**

(अर्थात् अशाप्रकारे हे गुह्याहूनही अती गुह्य ज्ञान मी तुला सांगितले आहे. आता तू या रहस्यमय ज्ञानाचा पूर्णपणे चांगल्या प्रकारे विचार करुन, जशी तुझी इच्छा असेल तसेच कर.)

गीतेचे प्रागट्य कुठे झाले आहे ते तर तुम्ही बघा ! युद्धाच्या मैदानात रणांगनावर गीता अवतरली आहे. जी निराश योद्धा अर्जुनाला जीवनाचा उद्देश आणि कर्तव्य समजावून सांगते.

गीता अवतरणाचा उद्देश युद्ध नव्हता सत्याच्या बाजूने व्यापक जनसमुदायाच्या सुख, शांति आणि मुक्तिदायक जीवनाची अंतर्दष्टी देणे हा होता. येथे दोन्ही बाजूचे युद्धाचे वेगवेगळे हेतू होते. दुर्योधन म्हणतो की "हे सर्वच योद्धे माझ्यासाठी प्राण द्यायला तयार आहेत." अर्थात् दुर्योधनाला राजसत्ता मिळवण्याची इच्छा होती.

**न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।**

**किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा ॥ (गीता 1.32)**

(अर्जुन म्हणतो की) हे कृष्ण ! मला विजय आणि राज्यही नको आणि सुखही नको. हे गोविंद ! स्वजनांना मारून मिळणाऱ्या राज्यपासून मला काय करायचे आहे ? आणि अशा प्रकारच्या सुख-भोगयुक्त जीवनापासून मला काय फायदा आहे ?

अशाप्रकारे अर्जुनाच्या जीवनात जनकल्याणाचा हेतू दिसतो आणि दुर्योधनाच्या जीवनात सत्तेची लालसा जो गीतेचे ज्ञान आत्मसात करतो, गीता त्याची हताशा, निराशा दूर करते. कर्तव्य-कर्म करण्याच्या मैदानात आलेला अर्जुन जेव्हा पळून जाण्याची तयारी करतो. "मी भिक्षा मागेन पण मी हे युद्ध लढणार नाही." असा विचार करणारा अर्जुन गीतेचे ज्ञान ऐकून शेवटी म्हणतो,

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।**

**स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥ ( गीता 18.73 )**

( अर्थात् हे अच्युत ! आपल्या कृपेने माझा मोह नष्ट झाला व मला माझी स्मृती प्राप्त झाली आहे. आता मी संशयरहित होऊन स्थित आहे. आता आपल्या आज्ञेचे पालन करीन. )

अशी कोणतीही सत्प्रेरणा व ज्ञान नाही की जे गीतेत नाही. अशी कोणतीही वैश्विक समस्या नाही की ज्याचा उपाय गीतेत नाही. फक्त पाहण्याची दृष्टी मानवाकडे असली पाहिजे.

विश्व मानवजातीच्या कल्याणकारी विचारांनी समृद्ध असल्यामुळे गीतेला "वैश्विकग्रंथ" मानण्यात आले आहे. हे सर्वश्रुत आहे की जगाच्या कानाकोपऱ्यातील विविध देश. तसेच धर्मातील तत्त्वज्ञ, महापुरूष आणि विद्वानांनी गीतेचा आदर करतांना खूप प्रशंसा केली आहे. हे भारताचे सौभाग्य आहे की या भूमीवर श्री गीता सारखा वैश्विक कल्याणाचा ग्रंथ अवतरित झाला. आणि हा भारतीय संस्कृतीचा शाश्वत अभिमान असेल.

गीता मानवाच्या आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक अशा त्रिविध दुःखामधून मुक्ती देणारा ग्रंथ आहे. गांधीजींनीही गीतेला, 'आध्यात्मिक निदानग्रंथ' असे संबोधून त्याचे महत्त्व स्थापित केले आहे.

## शब्दार्थ

**घागर** – पाणी भरण्याचे अरूंद तोंडाचे गोलाकार साधन, **ब्रह्मनिष्ठ** – ब्रह्मध्यानात गढून गेलेला, ब्रह्मज्ञ – **सद्गुरू** – खरा, चांगला, ज्ञान देणारा, **उद्योगी** – कष्टाळू, उद्योजक, **आत्मज्ञान** – स्वतःबद्दलचे ज्ञान, आत्मिक ज्ञान, आत्म्याचा साक्षात्कार, **तत्त्वज्ञान** – जीव, जगत आणि ईश्वराशी संबधित तीनही तत्त्वांचे ज्ञान, तत्त्वज्ञान, **शीघ्र** – सत्वर, जलद, लवकर, **धर्मात्मा** – धर्मनिष्ठ माणूस, पुण्यपुरूष – **पतीत** – पापी, **हितैषी** – हित, कल्याण, श्रेय इच्छिनारा, लाभ, फायदा, **अनभिज्ञ** – अज्ञात, मूढ, **चैतन्य** – चेतना, समज, ज्ञान, आत्मा, बळ, पराक्रम, **भरणपोषण** – गुजरान, निर्वाह – **गमनागमन** – जाणे, येणे, (येथे जन्म मृत्यु), **समदर्शी** – सारख्या दृष्टीने पाहणारा, निष्पक्षपाती – **तकनीकी** – तंत्रज्ञान, टेकनोलॉजी, **गुह्य** – लपवण्या योग्य, गुप्त, रहस्यमय.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) सर्वांना प्रिय होण्यासाठी गीता कोणता सिद्धांत सांगते ?

(2) परम शांती कशाप्रकारे मिळविता येते ?

(3) कोणत्या प्रकारचे मानव अत्यंत दुर्मिळ आहेत ?

(4) गीतेमध्ये आपल्याला कोणते गुण मिळतात ?

(5) सर्व प्राणिमात्रांचे सनातन बीज कोण आहे ?

(6) कोणते महापुरूष अत्यंत दुर्मिळ आहेत ?

(7) जीवनाचा खरा उद्देश काय आहे ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात थोडक्यात उत्तरे द्या :**

(1) 'ईश्वर एकच आहे' असे का म्हणता येईल ?

(2) 'भगवंत' शब्दाचा काय अर्थ करण्यात आला आहे ?

(3) गीतेमध्ये युद्धाच्यां दोन्ही बाजूंचा कोणता हेतू दिसतो ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) ''ईश्वर एकच आहे व तो सर्वव्यापी आहे'' ते निबंधाच्या आधारे स्पष्ट करा.

(2) गीतेची वैचारिक तत्त्वे – तुमच्या शब्दात लिहा.

(3) ज्ञानी महात्म्यांकडून तत्त्वज्ञानाची शिकवण कशी घ्यावी.

(4) गीता वाचणारी व्यक्ति कोणते सद्‌गुण आत्मसात करते ?

## विद्यार्थी-प्रवृत्ती

(1) 'कृष्ण आणि मानव संबंध' लेखक: हरीन्द्र दवे, 'कृष्णावतार' लेखक: कनैयालाल मुनशी याची पुस्तके मिळवा आणि वाचा.

(2) You Tube, Google गीता चिंतन, प्रवचन ऐकणे.

(3) तुमच्या परिसरात आयोजित भगवद् कथेत सहभागी व्हावे.

(4) गीतेवर आधारित सूत्रमाला तयार करणे Facebook, Status, Whats App इ. वर ठेऊन प्रचार-प्रसार करणे.

(5) गीतेच्या सिद्धांतांचे प्रत्यक्ष अमलीकरण करणे.

(6) 'गीताज्ञान: आत्म्याचे औषध' विषयावर निंबध तयार करणे.

## शिक्षक-प्रवृत्ती

(1) प्रार्थना सभेमध्ये गीता व्याख्याने आयोजित करणे.

(2) गीता आधारित प्रश्नमंजुषा, सूत्रलेखन, वक्तृत्व इत्यादी स्पर्धा आयोजित करणे.

(3) विद्यार्थ्यांना विविध सेवा प्रकल्पात सहभागी करून घेणे.

(4) गीतेविषयी चर्चा बैठक आयोजित करणे.

(5) 'गीता तत्त्वांचे सारदर्शन' या विषयावर प्रोजेक्ट तयार करा.

# 24 भारतीय शाश्वत मूल्ये आणि गीता

भारत हे सर्वात जुने राष्ट्र आहे. संस्कृति, ज्ञान, समृद्धि, शांती, सौहार्द, एकता, शोध, समरसता, समर्पण इत्यादी आपले मानक मूल्ये आहेत. भारत मौल्यवान आणि सर्जनशील सामग्रीचे भंडार आहे. असे अनेक प्राचीन-अर्वाचीन महापुरूषांनी स्वीकारले आहे. मार्क टवे ने लिहिले आहे की ''भारतभूमी उपासना पंथाची धात्री, मानवजातीची पालनकर्ता भाषांची जन्मभूमी, इतिहासाची माता, पुराणांची आजी आणि परंपरांची पणजी आहे.''

कोणत्याही देशाचे साहित्य हे तेथील समाजाचे प्रतिबिंब असते. कोणत्याही देशाचा भूतकाळा पासून ते वर्तमानकाळापर्यंतचा परिचय साहित्याच्या माध्यमातून मांडला जातो. भारतीय संस्कृतीतील रामायण आणि महाभारत ही दोन आर्ष महाकाव्ये आहेत. त्यांची दिव्य गाथा मानवजातीच्या हृदयात अजरामर आहेत. वेदव्यास स्वत: लिहितात. यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत् क्वचित्। (62.53) म्हणजे जे इथे (महाभारतात) आहे. ते जगात कुठेना कुठे तरी सापडेल, जे इथे नाही ते जगात कुठेही नाही. आजही हा ग्रंथ प्रत्येक भारतीयासाठी अनुकरणीय आहे. या महाभारत ग्रंथातच जगासाठी मार्गदर्शक अशी भगवद्गीता सामावलेली आहे. ज्यापैकी काही मुंद्दे आपण विचारात घेऊ यां.

**(1) ज्ञानप्रणाली ( प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । 4.34 )**

भारतीय सनातन परंपरेत 'जिज्ञासेचे समाधान' ही आदर्श ज्ञानप्रणाली आहे. भगवान बादरायनने ''ब्रह्मजिज्ञासा'' पासून ब्रह्मसूत्राची सुरूवात केली. 'अथातो ब्रह्म जिज्ञासा' भारतीय संस्कृती ही केवळ उपदेशांवरच आधारित नाही. वैयक्तिक मतभेदावर आधारित जीवनात आलेल्या समस्या आणि प्रश्न ज्ञानी व्यक्ति महापुरूषांसमोर मांडण्याची आपली प्राचीन पद्धत आहे. त्यामुळे आपल्याला योग्य मार्ग व उपाय मिळतो.

अर्जुनाच्या कर्तव्यामुळे उद्‌भवणाऱ्या समस्या आणि त्याचे निराकरण या अठरा अध्यायांमध्ये गीता पसरलेली आहे.

**तिद्वध्दि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**

**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ( गीता 4.34 )**

(अर्थात् ते ज्ञान तू तत्वदर्शी ज्ञानीयांच्या जवळ जाऊन समजून घे, त्यांना विधीवत प्राणीपात केल्याने, त्यांची सेवा केल्याने आणि कपट सोडून नम्रपणे प्रश्न विचारल्याने ते परमात्मतत्त्वाला चांगल्या प्रकारे जाणणारे ज्ञानी महात्मे तुला त्या तत्त्वज्ञानाचा उपदेश करतील.)

प्रश्नोत्तर ही ज्ञानपरंपरेची एक श्रेष्ठ पद्धत आहे. येथे प्रश्न विचारणारा जिज्ञासू असला पाहिजे. असे अपेक्षित आहे येथे स्पष्टपणे सांगितले आहे की गुरुंची विवेकपूर्वक सेवा करून, प्रसन्न भाव प्राप्त करून प्रश्न विचारल्याने ज्ञान मिळते.

गीतेमध्ये या प्रमाणे अर्जुनाने भगवान श्रीकृष्णाची शरणागती स्वीकारली आहे.

**यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे ।**

**शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ ( गीता 2.07 )**

(अर्थात् माझ्यासाठी जे निश्चित कल्याणकारक साधन असेल, ते मला सांगावे कारण मी आपला शिष्य आहे, म्हणून आपणास शरण आलो आहे. मला मार्गदर्शन करावे.)

आपल्याकडे 'गुरूशिष्याची' अद्‌भूत भारतीय परंपरा आहे. हे एक असे नाते आहे की ज्यामध्ये नि:स्वार्थ, नि:शंक आणि निर्मळ अंत:करणाने ज्ञानप्राप्तीची साधना होते. गुरू साक्षात परब्रह्म म्हणूनच तर गुरूना साक्षात् परब्रह्म म्हटले आहे.

इतिहास साक्षी आहे की महान विभूतींनाही गुरूंना शरण जाऊन ज्ञानप्राप्ती झाली. श्रीरामानी गुरू विश्वामित्र आणि श्रीकृष्णांनी गुरू सांदिपनीच्या सहवासात राहून ज्ञान मिळवेले होते. शबरीचे गुरू मतंग ऋषी आणि मीराबाईंचे गुरू संत रैदास होते.

या गुरू शिष्य परंपरेत शिष्य गुरू जवळून ज्ञान मिळविण्यासाठी जिज्ञासू होऊन नम्रपणे गुरूना शरण जातो. अशाप्रकारे शरणागत शिष्याला गुरू आत्मज्ञान देतात. या परंपरेनुसार शिक्षकांचा आदर करणे, तसेच त्यांच्या विहित वचनांचे आदरपूर्वक पालन करणे. हा सेवाचा एक प्रकार आहे.

**(2) ईश्वराची सर्वव्यापकता ( वासुदेव: सर्वम् इति । गीता 7.19 )**

'वासुदेव सर्वत्र आहे.' अर्थात् हे सर्व ईश्वरमयच आहे. ईशावास्यमिदं सर्वम् । सृष्टीच्या कणा कणात ईश्वराचा वास आहे. सृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि विसरर्जनाचे कारण ईश्वरच आहे. हे सर्व शास्त्र पण सांगतात. छान्दोग्य उपनिषदात सांगितले आहे की सर्व खल्विदं ब्रह्म "हे सर्व ईश्वरमय आहे" (छान्दोग्य उपनिषद् 3.14.1)

येथे ईश्वराची सर्वव्यापकता सिद्ध होते. दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥ (गीता 10.12) देवांचा पण आदिदेव अजन्मा आणि सर्वव्यापी आहे.

**यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।**
**न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥ ( गीता 10.39 )**

(अर्थात् जे सर्व प्राणीमात्रांच्या उत्पत्तीचे कारण आहे. ते सुद्धा मीच आहे, कारण की असा चर किंवा अचर कोणताही प्राणी नाही, की जो माझ्यापासून रहित आहे.)

सृष्टीच्या प्रत्येक कणांत ईश्वराचा वास आहे. हा भगवद् भाव जोपासून जीवनाला सार्थक बनविण्याचा मार्ग दाखवतो. माझ्यामध्ये, तुमच्यामध्ये, आपल्या आजूबाजूच्या सर्व लोकांमध्ये आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये इश्वरतत्व वाहत आहे. हे सत्य लक्षात घेऊन प्रत्येकाशी सौजन्याने वागले पाहिजे. श्रीमद् भगवद्‌गीतेच्या नवव्या अध्यायाच्या 16 ते 18 श्लोकांमध्ये सृष्टीचा जनक, पोषक आणि संहारक ईश्वरच आहे त्याचे वर्णन केले आहे.

**(3) जीव हा ईश्वराचा अंश ( ममैवांशो जीवलोके । गीता 15.7 )**

प्रत्येक शरीरात असलेला जीव हा ईश्वराचा अंश आहे. आणि जर प्रत्येक जीव त्याचा अंश असेल तर आपल्या सगळ्यांमध्ये एक समान परमात्मा विद्यमान आहे. परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुष: पर: ॥ (गीता 13.23 ) (अर्थात् या देहात राहत असून सुद्धा, हा जीवात्मा वास्तविक परमात्माच आहे.) ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन: । (गीता 15.07) अर्थात् या शरीरात असलेला सनातन जीवात्मा माझाच अंश आहे.

या शरीराला देवालय (मंदिर) म्हटले आहे. जिथे साक्षात् परमात्मा विराजमान असेल त्या मंदिररूपी शरीराला किती शुद्ध आणि पवित्र ठेवणे ते आपल्या हातात आहे. शरीराच्या आंतरिक व बाह्य शुद्धीसाठी शुद्ध आहार, नैसर्गिक विहार, पवित्र विचार, सत्य वाणी, आणि प्रमाणिक आचरण जोपासले पाहिजे.

जर आपण प्राणीमात्रात ईश्वराचा अंश आहे हे अंत:करणपूर्वक स्वीकारले तर आपल्या सर्वांमध्ये प्रेम, दया, सद्भाव, मैत्री, अहिंसा इत्यादी गुणांचा स्वाभाविकपणे विकास होईल. आपल्यात असलेला हा भाव लहान-मोठ्या भेदभावांना नष्ट करून समानतेचा अनुभव देईल. अशारितीने नरामध्ये नारायण पाहण्याची आपली संस्कृति महान आहे.

**(4) आत्म्याची अमरता ( शाश्वतोऽयं पुराणो । गीता 2.20 )**

वैदिक परंपरेत आत्म्याची अमरता सिद्ध आहे. हा देह नश्वर आहे. तर आत्मा नित्य आणि शाश्वत आहे. आपण सगळे एकाच परमात्म्याचे अंश आहोत. शरीर अनित्य आणि आत्मा नित्य आहे.

**न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।**

**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ ( गीता 2.20 )**

( अर्थात् हा आत्मा केव्हाही जन्मत नाही आणि मरतही नाही तसेच उत्पन्न होऊन पुन्हा जन्मणारा आहे, असेही नाही. कारण हा अजन्मा, नित्य, सनातन आणि पुरातन आहे. शरीराचा नाश झाल्यावरही हा नाश पावत नाही. )

गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण म्हणतात. त्याप्रमाणे आत्मा अमर आहे. आणि देह नाशवंत आहे. यावरून हे शरीर आणि त्याची अवस्था सतत बदलत असते याची जाणीव ठेवली पाहिजे. या सतत बदलणाऱ्या चक्रात एकच अपरिवर्तनशील तत्त्व आहे आत्मा. जो साक्षी भावाने स्थित आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत, सकाळपासून रातत्रीपर्यंत शरीर, मन, विचार आणि प्रकृति हे सर्व बदलत असते. ही बदलणारी परिसरस्थिती पाहणारा अपरिवर्तनशील आत्माच आहे.

**(5) अवतारवाद ( सम्भवामि युगे युगे । गीता 4.8 )**

ईश्वर स्वतः धरतीवर केव्हा आणि कशासाठी अवतार धारण करतो त्याचे वर्णन स्पष्टपणे. करण्यात आले आहे.

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**

**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ( गीता 4.7 )**

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**

**धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥ ( गीता 4.8 )**

( अर्थात् हे भारत ! जेव्हा जेव्हा धर्माची हानी होते आणि अधर्माची वृद्धी होते तेव्हा तेव्हाच मी साकार रूपाने लोकांसमोर प्रगट होत असतो. साधुपुरूषांचा उद्धार करण्यासाठी आणि दुष्कर्म करणाऱ्यांचा विनाश करण्यासाठी तसेच धर्माची संस्थापना करण्यासाठी मी युगोयुगी प्रकट होत असतों. )

पुराणामध्ये भगवान विष्णूंचा मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध आणि कल्कि इत्यादि दशावतरांचे वर्णन आहे. ईश्वराचे हे अवतार सज्जनांचे रक्षण आणि धर्माची स्थापना करण्यासाठी झाले आहेत. या दशावतारांवरून हे समजते की ईश्वर जेव्हा जशी समस्या असेल तेव्हा तसे स्वरूप धारण करून प्रगट होतो व जगाला नवीन मार्ग दाखवतो.

सज्जनांच्या सत्कर्मात देव सदैव उपस्थित असतो. जेव्हा आपण नीतिमान बनतो तेव्हा देव एक सहाय्यक म्हणून आपल्या मदलीता येतो. सर्वशक्तिमान दैवी शक्ती नविनच स्वरूप धारण करून सत्कर्मीयांना मदतरूप होण्यासठी निमित्त रूपाने येते.

जीवनात प्रतिकूल परिस्थिती किंवा संकटाच्या वेळी आपण हताश किंवा निराश होऊ नये. सर्वशक्तीमान ईश्वर आपला अदृश्य सहारा आहे. मन:पूर्वक प्रार्थनेने देव सत्कर्म करणाऱ्याला नेहमी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मदत करतो अशी श्रद्धा आणि विश्वास हृदयात जिवंत ठेवावा.

**(6) समत्वभाव ( समत्व योग उच्यते । गीता 2.48 )**

**योगस्थ: कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनञ्जय ।**

**सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥ ( गीता 2.48 )**

( अर्थात् तू आसक्तीचा त्याग करून तसेच सिद्धी आणि असिद्धिमध्ये समान बुद्धी ठेवणारा होऊन योगामध्ये स्थिर होऊन कर्तव्यकर्मे कर, यालाच समत्व योग म्हटले जाते. )

गीताकार भगवान श्रीकृष्णाचा आवडता शब्द आणि भाव 'समत्व' आहे – समत्वभाव हा व्यक्तिच्या प्रगत अवस्थेचा परिणाम आहे. ही अवस्था प्राप्त झाल्यावर सुख–दु–ख, मान–अपमान, यश–अपयश इत्यादिमधील भेद दूर होतो. गीताकार याला 'योग' म्हणतो. हा भाव जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. कारण हा आदर्श आणि सुखी जीवनाचा महामार्ग आहे. या अवस्थेत पोहचल्या नंतर व्यक्तिच्या सर्व इच्छा नष्ट होतात आणि परम शांतिची अनुभूति होते.

जर आपण समत्वभाव जोपासला तर अपयश देखील आपल्याला दु:खी करू शकत नाही. एखाद्या व्यक्तिने आपल्याला चिडविले तरी त्याचा परिणाम आपल्या मनावर होत नाही. आपण कोणाकडूनही मान–सन्मानाची थोडी सुद्धा अपेक्षा ठेवत नाही. कवच ( ढाल ) प्रमाणे कार्य करतो.

**(7) समावेशी भाव ( मम तेजोंऽशसम्भवम् । गीता 10.41 )**

संसारातील (जगातील) सर्व वैभवशाली, तेजस्वी, आणि सामर्थ्यवान गोष्टी ईश्वराच्या तेजाच्या अंशातून निर्माण झालेल्या आहेत. भारतीय संस्कृतीने ईश्वराच्या विविध रूपांची पूजा आराधना स्वीकारली आहे. पद्धत किवा प्रक्रिया अगदी कोणतोही असू द्या, ईश्वराला तुम्ही ज्या स्वरूपात पूजतात त्याला तुम्ही त्याच स्वरूपात पावू ( मिळवू ) शकतात. भारतीय सनातन परंपरेत ईष्टदेव आणि उपासनेची पद्धत निवडण्याचे स्वातंत्र्य आहे.

**यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयार्चिंतुमिच्छति ।**

**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ ( गीता 7.21 )**

( अर्थात् जो – जो सकामी भक्त ज्या ज्या देवतेच्या स्वरूपाला श्रद्धेने पूजण्याची इच्छा करतो त्या त्या भक्ताच्या श्रद्धेला मी त्याच देवतेच्या ठिकाणी स्थिर करतो. )

भारतीय संस्कृती कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या उपासनेशी बांधील नाही. ही सर्व समावेशकता हे आपल्या संस्कृतिचे वैशिष्ट्य आहे.

जो व्यक्ति ज्या श्रद्धेसहीत ज्या देवाची पूजा करतो. भगवंत त्या व्यक्तिच्या श्रद्धेला त्या त्या देवाप्रति बळकट करतो. अशा रीतीने गीतेत भगवंताचा सर्वसमावेशक भाव अतिशय ठामपणे आणि स्पष्टपणे मांडला आहे.

**(8) कर्तव्यबोध ( श्रेयान् स्वधर्मो विगुण: । गीता 3.35 )**

अर्जुन स्वत:च्या स्वधर्मापासून (कर्तव्य) विचलित झाला आहे. म्हणून अर्जुनाला निमित्त बनवून आपल्या सर्वांना गीताने स्वधर्मे निधनं श्रेय: (गीता 3.35) 'स्वधर्म च श्रेयस्कर आहे ' असा संदेश देते.

स्वधर्म (कर्तव्य) पाळण्यात माणूस अनेकदा निराश होतो. म्हणून गीता प्रबोधन करते की 'जीवन रडण्यासाठी नाही; पळून जाण्यासाठी नाही; जीवन हसण्यासाठी आहे; खेळण्यासाठी आहे; संकटाचा धैर्याने सामना करण्यासाठी आहे; तसेच अखंड आशा आणि अतूट श्रद्धेच्या बळावर विकास करण्यासीठी आहे.'

अशा प्रकारे गीता माणसाला जीवनातील लहान-मोठ्या संघर्षांना धैर्याने उभे राहण्याचे बळ देते. म्हणून श्रीमद् भगवद्गीता ही कोणत्याही एका पंथविशेषाचा ग्रंथ नसून ती एका वैश्विक ग्रंथाची भूमिका पार पाडते. Gita is not the Bible of Hindusim but it is the Bible of Humanity.

●

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) ज्ञानप्राप्तीसाठी शिष्यामध्ये कोणते गुण आवश्यक आहेत ?

(2) अध्याय 2 च्या श्लोक 7 मध्ये अर्जुनची काय मागणी आहे ?

(3) आत्म्याचे अमरत्व विषयी तुमची काय समज आहे ?

(4) गीतेच्या शेवटी अर्जुनची स्थिती आणि निश्चय कसा आहे ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) ईश्वराची सर्वव्यापकता कळल्यानंतर माणसाच्या वर्तनात कोणता बदल घडतो ? त्याचा संपूर्ण सृष्टिवर कोणता परिणाम होतो ?

(2) सत्कार्य करणाऱ्यांसाठी अवतारवाद कशा रितीने आश्वासक आहे ?

(3) गीते बद्दल तुमचे भाव तुमच्या शब्दात वर्णन करा.

**3. सविस्तर टीप लिहा :**

(1) गीतेच्या शाश्वत मूल्यांची वर्तमानकाळात गरज.

(2) ईश्वराच्या अवतारवादाचे तुमच्या शब्दात वर्णन करा.

(3) भारतीय ज्ञानप्रणाली तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

(4) गीतेतील स्वधर्म (कर्तव्यबोध) समजवा.

## विद्यार्थी-प्रवृत्ती

(1) या पाठात दर्शविण्यात आलेली शाश्वत मूल्ये यासारखे इतर मूल्ये गीतेमधून शोधून प्रार्थना सभेत सादर करा.

(2) पाठात दिलेल्या शाश्वत मूल्यांचे सार तुमच्या शब्दात तयार करून आई-वडिलां बरोबर चर्चा करणे.

## शिक्षक-प्रवृत्ती

(1) गीताजयंती आणि गीता सप्ताह साजरे करणे.

(2) गीतेतील शाश्वत मूल्यांचे वर्तमानकाळातील प्रासंगिकतेवर चर्चा सभा आयोजित करणे.

(3) गीतेतील मूल्ये जीवनात कशा रितीने आणता येतील त्याची प्रसंगानुसार चर्चा करणे.

●